सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २३ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

जलसंपदा विभागाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडणार : ना विखे

अहिल्यानगर दि.२२ प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागाच्या अतिशय महत्वाच्या खात्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली, याबद्दल मी समाधानी असून, स्व.लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी कोकणात वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या तुटीच्या खो-यात आणण्याचे स्वप्न या निमित्ताने पुर्ण करण्याची संधी मिळाली असल्याची प्रतिक्रीया जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

मंत्रीपदाची शपथ आणि जलसंपदा विभागाची जबाबदारी मिळाल्यानंतर ना.विखे पाटील यांचे अहिल्यानगर येथे प्रथमच आगमन झाले. डॉ.विखे पाटील फौंडेशन येथे जेष्ठ समाजसेवक पद्मविभूषण आण्णासाहेब हजारे यांचे आशिर्वाद घेतले. त्यांनी केलेल्या सत्काराचाही स्विकार केला. आ.शिवाजीराव कर्डीले, आ.काशिनाथ दाते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, मा.आ. अरुणकाका जगताप, नाशिक विभागाचे आयुक्त डॉ.प्रविण गेडाम, जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ, जिल्हा पोलिस अधिक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आधिकारी आशिष येरेकर आदिंनी त्यांचे स्वागत केले.

माध्यमांशी बोलताना ना.राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, राज्य मंत्रीमंडळात जलसंपदा विभागाची मिळालेली जबाबदारी ही काम करण्याची एक संधी असून, विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोपविलेल्या जबाबदारीतून स्व.बाळासाहेब विखे पाटील यांचे स्वप्न पुर्ण करण्याचे दायित्व मुख्यमंत्र्यांनी माझ्यावर सोपविले आहे. ती जबाबदारी निश्चितपणे यशस्वी करण्यासाठी माझा प्रयत्न असेल असे त्यांनी सांगितले.

कोकणात वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या तुटीच्या खो-यात वळविण्यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी महाराष्ट्र पाणी परिषदेच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारला मसुदा सादर केला होता. त्याचेच आता धोरणात रुपांतर झाले. विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही आता हा महत्वकांक्षी प्रकल्प पुर्ण करणाचे ध्येय ठेवले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यासाठी पुढाकार घेतल्याने गोदावरीच्या तुटीच्या खो-यात पाणी वळविण्याचे ऐतिहासिक काम भविष्यात पुर्ण करण्यासाठी आता वाटचाल असेल. कृष्णा खो-यातील पाणी प्रश्नाबाबतही

समाजसेवक पद्मश्री पोपटराव पवार यांच्या कुटूंबातील विवाह सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. डॉ.विखे पाटील फौंडेशनमध्ये पद्मविभूषण आण्णासाहेब हजारे यांच्यासह मंत्री विखे पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी जलसंपदा मंत्री गिरीष महाजन उपस्थित होते.

निश्चित असे धोरण घ्यावे लागेल. बिगर सिंचनाचे वाढते प्रमाण, शेतीच्या पाण्याचे निर्माण होणारे प्रश्न, पाण्याची उधळपट्टी थांबविणे आणि पाणी सोडण्याच्या वितरण व्यवस्थेत चांगली सुधारणा करणे. यासाठी आता काम करावे लागणार असल्याचे ना.विखे पाटील म्हणाले.

विधानसभेत विरोधी पक्षनेता नाही, यावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, विरोधी

पक्षाचा अवतार निवडणूकीतच संपला होता. निवडणूकीच्या दरम्यानच महाविकास आघाडीत बिघाडी सुरु झाली होती. त्यांचे अस्तित्व आता राहीलेले नाही अशी टिका करुन, त्यांनी सांगितले की, मराठा आरक्षणाच्या संदर्भात जरांगे पाटील यांनी नव्या सरकारला थोडा वेळ दिला पाहीजे. यापुर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजाला दिलेले आरक्षण कायदेशिरदृष्ट्या टिकले होते. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आमचे सरकारही सकारात्मकच आहे. मात्र मध्यंतरी महाविकास आघाडी सत्तेवर आल्यामुळे मराठा समाजाला मिळालेले आरक्षण गमवावे लागले. आरक्षणाच्या बाबतीत महाविकास आघाडी गंभिर नव्हते याचे पाप त्यांच्या डोक्यावर आहे.

राज्यात महायुतीचे सरकार होते त्यावेळी आरक्षणाच्या बाबतीत आवश्यक तेवढे सर्व निर्णय घेण्यात आले होते. मागासवर्ग आयोगाची निर्मिती केली. राज्यात ५८ मोर्चे आणि अनेकांचे बलिदान झाले. पण ही सर्व परिस्थिती संयमाने हाताळण्याची जबाबदारी ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यशस्वी केली होती.

आताही त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यात नव्याने सरकार स्थापन झाले आहे. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता, चर्चेतुन हा प्रश्न सोडविता येईल. जरांगे पाटलांनी नव्या सरकारला थोडा वेळ दिला पाहीजे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

बीड आणि परभणी येथील घटनेबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, या दोन्हीही घटनांबाबत मुख्यमंत्र्यांनी नागपुर आधिवेशनामध्ये सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. या दोन्हीही घटना अतिशय दुर्दैवी असून, दोषी व्यक्तिंवर कारवाई करण्याच्या सुचनाही देण्यात आल्या आहेत. घटनेबाबत आता चौकशी समितीही नेमण्यात आली असून, या घटनेचे आता राजकारण करु नये. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी येवून जातील परंतू त्यानंतर निर्माण होणारा सामाजिक तणाव तसेच जातीजातींमध्ये उमटणारे पडसाद याची जबाबदारी ते घेणार का असा सवाल ना.विखे पाटील यांनी उपस्थित केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अहिल्यानगर येथे स्वागत

अहिल्यानगर दि.२२- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालयाच्या हेलिपॅड येथे आगमन झाले. त्यांच्या समवेत विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे होते. जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. अण्णा हजारे यांना समाजसेवेसाठी उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे अशी सदिच्छा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी आमदार संग्राम जगताप, शिवाजीराव कर्डिले, काशिनाथ दाते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी मुख्यमंत्री महोदयांच्या शिर्डी विमानतळ येथे आगमन झाले. उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी त्यांचे स्वागत केले.

मुख्यमंत्र्याकडे गृह, ऊर्जा, एकनाथ शिंदेना नगर विकास गृहनिर्माण तर अजितदादाकडे अर्थ व उत्पादन शुल्क

मंत्रिमंडळाच्या खातेवाटपाला मिळाला मुहूर्त

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई,: मंत्रिमंडळ विस्तारानंतर सहा दिवसापासून प्रलंबित असलेल्या माहिती सरकारच्या खाते वाटपाला शनिवारी मुहूर्त मिळाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अपेक्षेपमाणे गृह, ऊर्जा न्याय व विधी प्रमुख खाती आहेत तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास , गृहनिर्माण व ग्रामविकास खाते देण्यात आला आहे तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अपेक्षप्रमाणे अर्थ व उत्पादन शुल्क विभाग देण्यात आले आहे.

हिवाळी अधिवेशनचे सूप वाजल्यानंतर रात्री मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर करण्यात आले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे महसूल तर चंद्रकांत दादा पाटील यांना उच्च तंत्र शिक्षण व हसन मुश्रीफ यांना यांना वैद्यकीय शिक्षण खाते देण्यात मिळाले आहे .शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस कडून मिळण्यासाठी मोठी चळवळ सुरू होती मात्र भाजपाने बहुतांश महत्त्वाची खाती आपल्याकडे ठेवली आहेत.मावळत्या सरकारमधील बहुतांश मंत्र्यांना पूर्वीचीच खाते मिळाली आहेत.

मंत्री व त्यांची खाती अशी: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस - गृह , ऊर्जा , सामान्य प्रशासन विधी व न्याय आणि अन्य मंत्र्याकडे नसलेले खाती, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे: नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम सोडून), उपमुख्यमंत्री अजित पवार : अर्थ व नियोजन, उत्पादन शुल्क, कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे - महसूल, राधाकृष्ण विखे पाटील - जलसंधारण (गोदावरी व कृष्णा खोरे विकास), हसन मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण, चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री,गिरीश महाजन - जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन. गुलाबराव पाटील - पाणीपुरवठा

गणेश नाईक - वन,दादाजी भुसे - शालेय शिक्षण, संजय राठोड - माती व पाणी परीक्षण,धनंजय मुंडे - अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण,मंगलप्रभात लोढा - कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन,उदय सामंत - उद्योग व मराठी भाषा,जयकुमार रावल - विपणन, प्रोटोकॉल ,पंकजा मुंडे - पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन,अतुल सावे - ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतनीकर ,अशोक उईके - आदिवासी विकास मंत्रालय ,शंभूराज देसाई - पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय,आशिष शेलार - माहिती व तंत्रज्ञान ,दत्तात्रय भरणे - क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय,अदिती तटकरे - महिला व बालविकास ,शिवेंद्रराजे भोसले - सार्वजनिक बांधकाम,माणिकराव कोकाटे - कृषी ,जयकुमार गोरे - ग्रामविकास, पंचायत राज,नरहरी झिरवाळ - अन्न व औषध प्रशासन,.संजय सावकारे - कापड संजय शिरसाट - सामाजिक न्याय .प्रताप सरनाईक - वाहतूक .भरत गोगावले - रोजगार हमी,फलोत्पादन,.मकरंद पाटील - मदत व पुनर्वसन,.नितेश राणे - मत्स्य आणि बंदरे ,आकाश फुंडकर - कामगार ,बाबासाहेब पाटील - सहकार ,प्रकाश आबिटकर - सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री : माधुरी मिसाळ - सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण,आशिष जयस्वाल - अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय मेघना बोर्डीकर - सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा इंद्रनील नाईक - उच्च आणि तंत्र शिक्षण , आदिवासी विकास आणि पर्यटन

मंत्र्यांच्या खाते वाटपानंतर आता पालकमंत्री पदासाठी चढाओढ

रायगड, बीड संभाजीनगर, पुणे, कोल्हापूर कोणाकडे?

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई , दि.२२ डिसेंबर : महायुती सरकारच्या बहुप्रतिक्षेत खातेवाटप जाहीर झाल्यानंतर आता पालकमंत्री पदासाठी मंत्र्यांमध्ये चढाओढ सुरू झाली आहे. पुणे,रायगड,,छ. संभाजीनगर , नाशिक ,बीड, जळगाव , सातारा, यवतमाळ या जिल्ह्यातील पालकमंत्री पद मिळविण्यासाठी

एकाच जिल्ह्यातील भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांकडून प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्यात एकमत होण्यासाठी पालकमंत्र्यांची नियुक्ती काही दिवस लांबणीवर टाकली जाईल असे सूत्रांकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीत २३ नोव्हेंबरला लागलेल्या निकालात महायुतीने २८८ पैकी तब्बल २३७ जागा पटकावत पुन्हा सत्तेवर आले. मात्र मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या शपथविधीसाठी ५ डिसेंबर उजाडावा लागला.त्यानंतर मंत्री पदासाठी घटक पक्षात रस्सीखेच कायम राहिल्याने मंत्रीमंडळ विस्तारासाठी आणखी १० दिवसाचा अवधी लागला.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपूरच्या राजभवनात ३३ कॅबिनेट व ६ राज्यमंत्र्यांना शपथ देण्यात आली.मात्र ६ दिवसाचे अधिवेशन संपेपर्यंत खाते वाटप करण्यात आले नाही. अखेर शनिवारी रात्री मुख्यमंत्र्यांसह एकुण ४२ मंत्र्यांना खाते जाहीर करण्यात आले. त्यामध्ये मुख्यमंत्र्यांनी अपेक्षेप्रमाणे आपल्याकडे गृह ,ऊर्जा सामान्य प्रशासन न्याय वविधी हे महत्त्वाचे विभाग आपल्याकडे ठेवले आहेत तर उपमुख्यमंत्री शिंदे यांना नगर विकास गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) आणि अजित पवार यांच्याकडे अर्थ व नियोजन आणि उत्पादन शुल्क ही महत्त्वाची विभाग सोपवण्यात आले. त्याशिवाय अन्य बहुतांश मंत्र्यांकडे मागच्या सरकार मधली खाती कायम ठेवण्यात आली आहेत. आता मंत्र्यांची चढाओढ लागली आहे ती पालकमंत्री मिळवण्यासाठी .

त्यामध्ये सर्वाधिक वाद आहे तो रायगड जिल्ह्यातील या ठिकाणी राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे व सेनेचे भरत शेठ गोगावले यांच्यामध्ये प्रचंड चढाओढ आहे. सरकारची स्थापना होण्यापूर्वीच सेनेचे कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी तटकरे यांना पालकमंत्री करू नये, अशी उघड भूमिका घेतली होती. जिल्ह्याचे पालकमंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेच राहण्याचे शक्यता आहे मात्र या ठिकाणी भाजपाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील हे इच्छुक आहेत. त्या ठिकाणी त्यांना संधी न मिळाल्यास ते गृह जिल्हा असलेल्या कोल्हापूरसाठी ते आग्रह करतील .अशी शक्यता आहेकोल्हापूर जिल्ह्यात हसन मुश्रीफ व प्रकाश आबिटकर हे दोघे मंत्री असून मुश्रीफ हे जेष्ठ आहेत. मात्र आबिटकर ही इच्छुक आहेत.

त्यानंतर बीड जिल्ह्यात पंकजा मुंडे व धनंजय मुंडे या चुलत बहिण भाऊंना मंत्रीपद मिळाले आहे .त्यापैकी दोघेही जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळवण्यासाठी इच्छुक आहेत निवडणुकीनंतर या ठिकाणी अत्यंत निघृणपणे हत्या करण्यात आलेल्या सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाइंड वाल्मिकी कराड याला धनंजय मुंडे यांचे उघड वरदहस्त असल्याने त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे.

त्यामुळे पंकजा मुंडे यांना पालकमंत्री पद दिले जाण्याची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यात गिरीश महाजन ,संजय सावकारे व शिवसेनेचे गुलाबराव पाटील हे मंत्री असून महाजन व पाटील दोघे पालकमंत्री पदासाठी प्रयत्नशील आहे.

छ. संभाजीनगरचे पालकमंत्री मीच होईल असे शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट उघडपणे म्हणत आहेत मात्र इच्छुक आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जिल्ह्याचे पालकमंत्री पद वाटप करताना कस लागणार आहे

विठ्ठलपूजेचे बुकिंग १ जानेवारीपासून

सोलापूर : सावळ्या विठुरायाची पूजा करण्यासाठीची हजारो भाविकांची प्रतीक्षा आता संपली आहे. नवीन वर्षातील पहिल्या तीन महिन्यांसाठी येत्या १ जानेवारी रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या नित्य, तुळशीपूजा, नित्यपूजा आणि पाद्यपूजेसाठी ऑनलाइन बुकिंग सुरू केले जाणार आहे. भाविकांनी विठ्ठल- रुक्मिणी मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरच ऑनलाइन बुकिंग करावे, असे आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे. पूजेची नोंदणी करण्यासाठी आतापासूनच भाविक सज्ज झाले आहेत. श्री विठ्ठल आणि रुक्मिणीच्या नित्य, तुळशी आणि पाद्यपूजेमध्ये पारदर्शकता आणि सुसूत्रता यावी यासाठी मंदिर समितीने प्रथमच ऑनलाइन बुकिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. तशी यंत्रणा देखील कार्यरत केली आहे. नव्या वर्षातील विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या सर्व पूजांचे बुकिंग हे ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. या नव्या संगणकीय प्रणालीमुळे वशिलेबाजीला चाप बसणार आहे. त्यामुळे भाविकांमधून देखील मंदिर समितीच्या या नव्या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ मुंबईत मोर्चा

तभा वृत्तसेवा/ प्रतिनिधी

मुंबई, दि.२२ डिसेंबर : राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल लोकसभेत अपमान करणारे वक्तव्य करणारे भारताचे गृहमंत्री अमित शाह यांच्या विरुद्ध निषेध मोर्चा काढण्यात आला.

उत्तर मध्य मुंबई जिल्ह्यातील चांदिवली मतदार संघात प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्ष नसीम खान यांच्या नेतृत्वात साकीनाका येथील पेनुनसुला हॉटेल पासून निषेध मोर्च्याला सुरुवात झाली.अमित शाह यांच्या विरुद्ध जोरदार घोषणा देत निघालेला मोर्चा चांदिवली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून समाप्त करण्यात आला. यावेळी नसीम खान म्हणाले की, लोकसभेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनादर करीत आक्षेपार्ह विधान करणारे अमित शाह यांनी सर्व जनतेसमोर जाहीर माफी

मागावी आणि त्वरित राजीनामा द्यावा.देशात भाजपा सरकार आल्यापासून महाराष्ट्रासहित देशातील विविध राज्यात बहुजनावरील अत्याचारांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. परभणी, बीड मधील घटना असो किंवा मुंबईतील पवई येथील जयभीम नगर मधील मागासवर्गीय परिवारांना बेघर केल्याची घटना असो अशा कितीतरी घटना संपूर्ण देशात घडत असून भाजपा सरकार आणि त्यांचे नेते देशातील विविध समाजावर अशा प्रकारचे भाष्य करून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करीत आहे.

मोर्च्यात साधू कटके, प्रकाश बि-हाडे, गौतम साबळे, शंकर वाघ, योगिराज भोसले, कुमार कांबळे, वजीर मुल्ला, भरत सिंह, शहजादे शेख, मनोज तिवारी, रियाज मुल्ला, संजय उपाध्याय, मूर्तजा अंसारी,आशिष जाधव, नीलेश वाघमारे आदी उपस्थित होते.

भारत स्वदेशी रॉकेटच्या माध्यमातून करणार जैविक प्रयोग!

इस्त्रोच्या शास्त्रज्ञांपुढे असेल मोठी आव्हानात्मक जबाबदारी

बंगळुरू : भारत प्रथमच स्वदेशी रॉकेटच्या माध्यमातून अंतराळात जैविक प्रयोग करणार आहे. ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यानाचे (पीएसएलव्ही) पुढील प्रक्षेपण अंतराळात ३ जैविक प्रयोग करणार आहे. यामध्ये सजीव पेशी अंतराळात पाठवण्यात येणार आहे. अंतराळातील वातावरणात या गोष्टी जिवंत ठेवणे हे इस्त्रोच्या शास्त्रज्ञांपुढे मोठा आव्हान असणार आहे. पीएसएलव्हीच्या माध्यमातून वाहतूक करण्यात येणाऱ्या सेंद्रिय वस्तूंमध्ये पालक, लोबीया आणि बॅक्टेरिया सारख्या गोष्टींचा समावेश आहे. इस्त्रोने याला पीएसएलव्ही ऑर्बिटल एक्सपेरिमेंटल मॉड्यूल-४ (पीओएम-४) असे नाव दिले आहे. अशा तऱ्हेने इस्त्रो अंतराळ विश्वात एक मोठा विक्रम करण्याच्या तयारीत आहे. इस्त्रोचा हा प्रयोग गगनयान मोहिमेतही उपयुक्त ठरणार आहे.अंतराळात सजीव वस्तु जिवंत ठेवणे मोठे आव्हानात्मक काम असते. कारण सर्व सर्व वस्तु लाईफ सपोर्ट सिस्टीम सीलबंद बॉक्समध्ये ठेवाव्या लागतात. पीएसएलव्हीचा हा चौथा टप्पा आहे. वास्तविक अंतराळात सजीवांना पाठवून त्यांच्यावर काय परिणाम होतात याचा अभ्यास इस्त्रो या मोहिमेतून करणार आहे.

इस्त्रोचे अध्यक्ष डॉ. एस. सोमनाथ म्हणाले की, इस्त्रो पहिल्यांदाच अंतराळात असा प्रयोग करणार आहे. पीएसएलव्ही प्रक्षेपकाचा वापर करून भारतीय सजीव अंतराळातील प्रतिकूल वातावरणात कसे टिकून राहतील याचा अभ्यास करणार आहेत. इस्त्रोची ही छोटीशी जैविक मोहीम असून, त्याचा फायदा गगनयान मोहिमेत भारताला होणार आहे. गगनयान मोहिमेअंतर्गत भारतीय अंतराळवीरांना भारतीय रॉकेटमधून अंतराळात पाठवले जाणार आहे. ही भारताची पहिली मानव मोहीम असणार आहे. त्याचबरोबर २०३५ पर्यंत अंतराळात भारतीय अंतराळ स्थानक देखील तयार करण्याची भारताची मनीषा आहे. या साठी विविध प्रयोग व प्रकल्प इस्त्रोमार्फत हाती घेतले जाणार आहे. विशेष म्हणजे पीएसएलव्हीची पुढची मोहीम सी-६० आहे. ही देखील एक अत्यंत प्रायोगिक मोहीम आहे, ज्याचा मुख्य वापर स्पेस डॉकिंग एक्सपेरिमेंट (स्पेडेक्स) आहे. याअंतर्गत इस्त्रो पहिल्यांदाच दोन भारतीय उपग्रहांचे अंतराळात डॉकिंग आणि अनडॉकिंग करणार आहे.

अंतराळातील शून्य गुरुत्वाकर्षणाच्या वातावरणात पेशी कशा प्रकारे काम करतात, याची चाचणी मुंबईतील ऍमिटी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ करणार आहे. बेंगळुरूच्या आरव्ही कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे यूजीचे विद्यार्थी आतड्यातील जीवाणूंचा वापर करून भारतातील पहिले मायक्रोबायोलॉजिकल पेलोड आरव्हीसॅट -१ अंतराळात पाठवणार आहेत. आतड्याचे बॅक्टेरिया बंद कॅप्सूलमध्ये अंतराळात पाठवले जाणार आहे.

शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ, सतरा वस्ती शाळा बंद

कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याची फर्मान

तभा वृत्तसेवा - सहयोग प्र.जावळे

कन्नड :- दि.२२ डिसेंबर - तालुक्यात शिक्षण विभागाचा सावळा बाजार उघडकीस आला असून तब्बल सतरा वस्ती शाळा बंद पडल्या आहेत,तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याने नेमकं काय गौडबंगाल आहे हे उलगडत नाही

शिक्षण विभाग व स्थानिक ग्राम पंचायतच्या दुर्लक्षामुळे तालुक्यातील वस्ती शाळांची पटसंख्या घटत आहे. त्यामुळे वस्ती शाळा बंद पडत आहे. या बंद वस्तीशाळेवर अतिक्रमण होताना दिसून येत आहे. पटसंख्या वाढवण्याची व अतिक्रमण काढण्यासाठी संबंधित अधिकारी धजावत नसल्याचे दिसून येत आहे. तालुक्यात एकूण ९३ वस्तीशाळा वर्गखोल्यासह सुसज्ज होत्या.

या वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी शासनाने करोडो रुपये खर्च केले. परंतु या ९३ शाळा पैकी १७ वस्तीशाळा विद्यार्थी पटसंख्ये अभावी बंद पडल्या आहेत. या शाळांसाठी बांधण्यात आलेल्या वर्ग खोल्या व परिसराचा वापर वास्तव्यासाठी, गुरे पाळीव पशु, शेती साहित्य, गुरांचा चारा व सरपण ठेवण्यासाठी होताना दिसून येत आहे.

शिक्षणविभाग या शाळा इमारत संरक्षणाची जबाबदारी झटकत,ती जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतची असल्याचे सांगत आहे. शेतवस्तीच्या ठिकाणी एक किलो मीटर अंतरा पेक्षा जस्त अंतरावर शाळा असेल तर अशा ठिकाणी ग्रामपंचायतचा वस्ती शाळा सुरू करण्याचे प्रस्तावावर शाळा सुरू करण्याचे धोरण शासनाचे होते. पण काही ठिकाणी या धोरणाला हरताळ फासताना दिसून येत आहे. बंद वस्तीशाळेवरील शिक्षकांचे लगेच समायोजन दुसऱ्या प्राथमिक शाळेवर करण्यात येत आहे.

या आहेत बंद १७ वस्ती शाळा

वासडी केंद्रातील लादा वस्ती , हनुमान वाडी , बहिरोबा वस्ती , भिल्ल वस्ती , करंजखेडा केंद्रातील जाधव वस्ती , तलाववाडी , औराळा केंद्रातील काळे वस्ती , चिंचोली केंद्रातील गणेशपूर , शेलगाव केंद्रातील सारंगवाडी , गव्हाळी वाडी , म्हसोबा वाडी , धरण वाडी , देवगाव रं केंद्रातील पाबळवाडी , शिवराई माऊली वस्ती , चिकलठाण म फु वस्ती.

माहिती देण्यास टाळाटाळ

याबाबत माहिती विचारली असता गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने नेमकं हे गौडबंगाल काय आहे हे उलगडेना,तर कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याचे कर्मचारी सांगून हात वर करत आहेत.

कल्चर, हेरिटेज, ट्रॅडिशन आणि आता सस्टेनेबिलिटी

पुणे : मिर्चीच्या सहकार्याने होणाऱ्या एस. बी. आय. ग्रीन मॅरेथॉनच्या पाचव्या सिझनच्या पुणे एडिशनमध्ये, भविष्यात पुणे शहर अजून हिरवेगार होण्यासाठी योगदान देत शहराने 'फिनिशर मेडल्स' अभिमानाने मिरवली. 'हेल्दी प्लॅनेट'' साठीच्या प्रयत्नांत यशस्वी होण्यासाठी पुण्यातील रहिवाशांनी कंबर कसली आहे. एस. बी. आय. ग्रीन मॅरेथॉनने मिर्चीच्या सहकार्याने, सर्वांना स्वतःसोबतच, 'हेल्दी प्लॅनेट''साठी धावण्यास प्रोत्साहित केले, आणि मागील ४ सिझन पेक्षाही यावर्षी सहभागी झालेल्या धावपटूंच्या संख्येतून, सर्व धावपटूंची फिनिश लाईन पार करण्याची इच्छा सिद्ध झाली. पाचव्या सिझनच्या पुणे एडिशनमध्ये, २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी.. वेगवेगळ्या बॅकग्राउंड मधील, वयोगटातील आणि धावण्याचा अनुभव असलेले, सुमारे २०००हून अधिक धावपटू या स्पर्धेत धावण्यासाठी पीडब्ल्यूडी मैदानावर उत्साहाने जमले.

'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे प्रथा कलेक्शन सादर

पुणे, डिसेंबर २०२४ : महाराष्ट्रातील आघाडीचा ज्वेलरी ब्रँड असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे भारतातील लग्नसराईच्या काळासाठी नववधूच्या दागिन्यांचे नावीन्यपूर्ण 'प्रथा कलेक्शन' सादर करण्यात आले आहे. हे आकर्षक कलेक्शन विवाह सोहळ्याच्या समृद्ध प्रथा आणि परंपरांचा उत्सव साजरे करणारे आहे. यंदाच्या वर्षी जानेवारीमध्ये हे कलेक्शन पहिल्यांदा सादर केले गेले. त्यानंतर राज्यभरातून या कलेक्शनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भरजरी नववधूचे दागिने, नेकलेसेस, चोकर्स, आकर्षक हिऱ्यांचे दागिने, ईअर रिंग्स, रिंग्स, मांग टिका, कडा इत्यादींद्वारे हे 'प्रथा कलेक्शन' जुन्या परंपरेच्या कलाकृतीतून व्यक्त होणारा आपला समृद्ध सांस्कृतिक वारसा दर्शविते. तसेच हिऱ्याच्या दागिन्यांच्या चाहत्यांसाठी या कलेक्शनचा विस्तार केला गेला असून चमकदार पोल्की, कुंदन आणि मोत्याच्या दागिन्यांचे डिझाईन उपलब्ध करण्यात आले आहे. बारीक, नाजूकशा रचनांद्वारे सोन्याच्या दागिन्यांसह 'प्रथा कलेक्शन'च्या नव्या आवृत्तीमध्ये मीनाकारी आणि जडाऊ डिझाईन्सची उत्कृष्टता समाविष्ट करण्यात आली आहे. लग्नसराईशी संबंधित सर्व प्रसंगांसाठी नववधूच्या पसंतीनुसार पारंपरिक दागिन्यांमध्ये समकालीन डिझाईन्सचा मिलाफ करण्यात आला आहे.

नियोजन विभागाच्या सह सचिवपदी विवेक गायकवाड यांची नियुक्ती

मुंबई : भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नतीने नियुक्ती मिळाल्यानंतर विवेक गायकवाड यांची राज्य शासनाच्या नियोजन विभागाच्या सहसचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत.

महावितरणच्या कर्मचाऱ्यास शिवीगाळ, एकावर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या कर्मचाऱ्यास शिवीगाळ करणाऱ्या इसमावर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. महावितरणच्या चिकलठाणा एमआयडीसी शाखेचे वरिष्ठ तंत्रज्ञ गोलाजी नागरे रविवारी दुपारी पावणे दोनच्या सुमारास ब्रिजवाडीतील जुन्या कमानीजवळच्या रिक्षा स्टँडवर बाह्यस्रोत कर्मचारी आकाश दणके यांच्यासह दुरुस्तीचे काम करत होते. त्यावेळी आरोपी ज्ञानेश्वर गोविंद पाखरे (रा.ब्रिजवाडी) याने काही कारण नसताना नागरे यांना शिवीगाळ केली आणि शासकीय कामात अडथळा आणला. नागरे यांच्या फिर्यादीवरून सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात आरोपी पाखरेवर गुन्हा दाखल करण्यात आला.

लंडनहून अँटी रेबीज लसीकरणासाठी टीम कल्याण डोंबिवलीत दाखल

डोंबिवली : कल्याण पूर्व मध्ये रेबीजमुळे पहिलाच मानवी मृत्यू गेल्या २० वर्षांत झाल्यामुळे डोंबिवली येथील पॉज संस्था आणि लंडनमधील वर्ल्ड वाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस तर्फे भटक्या श्वानाना मोफत अँटीरेबीज लसीकरण करण्यात आले. सुमारे १४० भटक्या जनावरांना ही अँटी रेबीज ची लस देण्यात आली. डोंबिवली, ठाकुर्ली, कल्याण, उल्हासनगर, आणि अंबरनाथ शहरात सदर मोहिम राबवण्यात आली असे पॉज संस्थेचे संस्थापक डॉ. निलेश भणगे यांनी सांगितले. शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असून, त्यांना रेबीजची लागण होण्याची शक्यता आहे. याचा मानवी आरोग्यालाही धोका संभवतो. पॉज'तर्फे दर वर्षी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रेबीज लसीकरण मोहीम घेतली जाते. ठाणे शहरासह उपनगरात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले आहे. रेबीज झालेला कुत्रा माणसाला चावल्यास त्याचा मृत्यू होऊ शकतो.

घरोघरी जाऊन योजनांचा लाभ देण्याचा प्रशासनाचा संकल्प : सिद्धाराम सालीमठ

अकोले तालुक्यातील मवेशी गावात 'प्रशासन गाव की ओर' उपक्रमाचे आयोजन

शिर्डी, दि.२२ - प्रशासनाने सकारात्मकता दाखविली तर अशक्य गोष्ट शक्य होते. प्रशासनातील सकारात्मक दृष्टिकोनाचा वापर करत नागरिकांच्या घरी जाऊन शासकीय योजनांचा लाभ देण्याचा संकल्प आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

अकोले तालुक्यातील मवेशी गावात सुशासन सप्ताहांतर्गत आयोजित 'प्रशासन गांव की ओर' या अभियानात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, संगमनेर उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, राहूल शेळके, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती देवकन्या बोकडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, गटविकास अधिकारी अमर माने आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी मवेशी गावातील ग्रामस्थ, महिला, पुरूष व तरूणांच्या समस्या जाणून घेतल्या. ते म्हणाले, मवेशी गावातील समस्यांची नोंद प्रशासनाने घेतली आहे. येथील एकाही नागरिकांने वैयक्तिक समस्या न मांडता सार्वजनिक समस्यांची मांडल्या आहेत, हे निश्चितच उल्लेखनीय आहे. याठिकाणी जॉब कार्ड वितरित करण्यात आलेल्या ग्रामस्थांना येत्या काही दिवसांत गावातच रोजगार उपलब्ध करून दिला जाईल. जल जीवन मिशन अंतर्गत पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यात येईल.

नारी भवन उभारणीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल. सर्प व विंचू दंशांवर प्राथमिक आरोग्य केंद्रात मुबलक औषधे उपलब्ध करून देण्याच्या सूचना आरोग्य विभागाला देण्यात आल्या आहेत. येत्या काही दिवसांत मवेशी ग्रामस्थांचे प्रश्न सुटलेले असतील, असेही जिल्हाधिकारी श्री.सालीमठ यांनी सांगितले.

येरेकर म्हणाले, संविधानाच्या लोक कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेवर आधारित आणि शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या धर्तीवर केंद्र शासनाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातून मवेशी गावाची झालेली निवड या भागातील नागरिकांचे राहणीमान उंचाविण्यासाठी सहायक ठरणार आहे. या शिबिरात विविध विभागांच्या स्टॉलवर जाऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया ग्रामस्थांनी पूर्ण करावी. महिन्याभरात अर्जावर लाभ देण्याची कार्यवाही केली जाईल.

अभियानांतर्गत कार्यक्रमस्थळी कृषी, पशुसंवर्धन, महसूल, आरोग्य, आदिवासी विकास, वन विभाग, पंचायत समिती, महिला व बालविकास, समाजकल्याण, दिव्यांग कल्याण, विशेष सहाय्य, संजय गांधी निराधार अनुदान योजना आदी विभागांचे योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलवर योजनांची माहिती देण्यात येऊन लाभार्थी नोंदणी करण्यात आली. आरोग्य विभागाच्या कक्षात महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. याप्रसंगी या शासकीय विभागाच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ प्रमाणपत्र, आयुष्यमान कार्ड, बेबी केअर कीट, जॉब कार्ड, ताडपत्री व धनादेशाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी शासकीय विभागांच्या स्टॉलला भेट देत अधिकारी- कर्मचाऱ्यांना सूचना केल्या.

या उपक्रमाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा मुक्काम मवेशी गावातील आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहात असणार आहे. मुक्कामादरम्यान ते गावातील नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये 'राष्ट्रीय गणित दिवस' उत्साहात

बिडकीन दि. २२ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा प्रायमरी प्रशालेत थोर भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती 'राष्ट्रीय गणित दिवस' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या गणितीय साहित्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बिडकीन जिल्हा परिषद केंद्र प्रमुख रमेश पवार व दुर्गा शाळेचे अध्यक्ष्य ओमप्रकाश जैस्वाल , संस्थेचे सचिव रोशन जैस्वाल , दुर्गा कॉलेज चे प्राचार्य अभिजित इंगळे सर व प्रमुख पाहुणे,गणित विभाग प्रमुख. सुनीता चव्हाण मिस इत्यादी प्रमुख पाहुणे यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद केंद्र प्रमुख रमेश पवार, पत्रकार अरुण देविदास, गणेश सोनवणे,अली इनामदार, इलियास शेख,अलिम शेख,या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला . यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणितीय साहित्याचे उद्घाटन करून त्याचे सर्वांसाठी प्रदर्शनही भरविण्यात आले होते. बिडकीन केंद्रातील सरस्वती भुवन प्रशाला , सृजन प्राथमिक प्रशला , उद्र प्राथमिक शाळा सोमपुरी, इत्यादी शाळांनी सहभाग नोंदविला. ८ वी ते १० वी गटात प्रथम क्रमांक कुणाल मोटे व अनुराग कुशवाह,द्वितीय क्रमांक , अनन्या गडकर व वेदांत गडकर तृतीय क्रमांक अथर्व जाधव तर ५ वी ते ७ वी गटात प्रथम क्रमांक गौरी ज्ञानेश्वर मोगल , द्वितीय क्रमांक अभिमन्यू वंजारे व तृतीय क्रमांक दोन विद्यार्थी अश्मिरा सय्यद व निहारिका साबळे यांना पारितोषिके देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन मयूर स्वामी यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील सर्वच विद्यार्थी व शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

यावेळी दुर्गा शाळेतील कोकणे मिस, चव्हाण मिस,दिक्षा मिस,ओसीन मिस,राणी मिस,शिवाणी मिस, अभिजित इंगळे सर या शिक्षकांनी गणित विषयात कशी गोडी निर्माण होईल या बद्दल मार्गदर्शन केले.

दिनदर्शिकेचे पी.आय. शिंदे यांच्या हस्ते विमोचन

वाळूज महानगर प्रतिनिधी- वाळूज एमआयडीसी परिसरातील विमा सल्लागार नरेंद्र त्रिभुवन यांच्या वतीने वाळूज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या हस्ते नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे विमोचन करून एलआयसी विषयी माहिती दिली.

नरेंद्र त्रिभुवन यांनी वाळूज औद्योगिक परिसरातील शेतकरी, कामगार, लघु उद्योजक, विद्यार्थी आदींना विमासेवा सातत्याने देत आहेत. नवीन वर्षाच्या नूतन दिनदर्शिकेचे वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आले .

यावेळी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्याचे एपीआय मनोज शिंदे, पीएसआय भाग्यश्री शिंदे, बाळासाहेब आंधळे राजाभाऊ कोल्हे योगेश शेळके विक्रम वाघ सुरेश कचे आदींची उपस्थिती होती.

मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.

जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क.: २२१/२०२४

अर्जदार : १. नामदेव नारायण देसाई, वय ७६ वर्षे, धंदा शेती, रा. नारळीबाग, सोयगांव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदारः कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर.ए. गिरी सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत नारायण काशिराम देसाई हे दि. ०३/१२/१९८७ रोजी नारळीबाग, सोयगांव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क १ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क १ हे मयत नारायण काशिराम देसाई यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख - २९/०१/२०२५.

आज दि. २१/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

जाहीर प्रगटन

(मौजे आरापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथिल शेतजमीन गट नं. ५४ मधील ० हे. ४० आर)

माझे पक्षकार श्री. सुरेश पोपटराव केरे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे आरापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथिल शेत जमीन गट नं. ५४ एकुण क्षेत्र ४ हे. ९० आर अधिक ४ आर पोटखराबा क्षेत्र या जमीनी पैकी श्री.प्रितेश अशोकचंद बोरा व श्री. योगेश सुभाष मालानी यांच्या मालकी व ताब्यातील संपूर्ण क्षेत्र ० हे. ४० आर जमीन ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून सदर जमीनीच्या चर्तुःसिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस गावठाण, पश्चिमेस, किशोर पोपटलाल चोरडीया यांची जमीन, दक्षिणेस - सरकारी रस्ता उत्तरेस- चंद्रभान पुंडलीक गायके यांची जमीन.

असे की, श्री.प्रितेश अशोकचंद बोरा व श्री. योगेश सुभाष मालानी यांनी सदरील जमीन दोषमुक्त व निर्विवाद असल्याची खात्री माझ्या पक्षकाराला दिली आहे. तरी देखील या जाहीर प्रगटाद्वारे तमान जनतेस कळविण्यात येते की, सदर वरील जमीनींशी कोणाचा काही एक हक्क संबंध, चोळी बांगळी गहाण, दान, बक्षिस, खरेदी-विक्री अथवा इतर कुठल्याही मार्गाने हक्क संबंध असल्यास त्यांनी प्रस्तूतचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कागदपत्रांच्या पुराव्यासह आमच्या नमूद पत्त्यावर आक्षेप नोंदवावी, मूदती आक्षेप न आल्यास माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करीता हे जाहीर प्रगटण आज दि.२१/१२/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

जाहिर प्रगटन देणार तर्फे
ॲड. दत्ता एकनाथराव पानकडे
मो.नं. ९५९५६६६६२२

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. असिफ चांद शेख, रा.सावंगी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद मो. नं. ९०११८४०९२२ हे परिशिष्टात नमुद मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. सदर मिळकती संदर्भातील पुर्वीचे मुळ दस्ताऐवज पैकी खरेदीखत दस्ताऐवज अनु नं. ४३७९/२००९ हे गहाळ झाले आहे. तरी गहाळ दस्ताच्या आधारे कुठलाही हितसंबंध निर्माण झाला असल्यास, खालील पत्यावर पुराव्यासह लेखी कळवावे.

परिशिष्ट : ग्रुप ग्रामपंचायत मौजे सावंगी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद हद्दीतील निवासी सहान जागा ग्रामपंचायत मिळकत नं. ४६७/२ क्षेत्रफळ २० बाय ३० फुट म्हणजेच ५५.७६ चौ. मी. क्षेत्रफळाची मिळकत चतुःर्सिमा खालील प्रमाणे

पुर्वेस : अनसार लतीफ यांची मिळकत
पश्चिमेस : शेख शमीम शेख गणी यांची मिळकत
दक्षिणेस : ग्रामपंचायत रस्ता
उत्तरेस : बंब यांची मिळकत
करीता प्रगटन.
दि.२१/१२/२०२४

मार्फत
ॲड.एस.पी.लबडे,
गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद
मो.नं. ९८६०३४५६६१

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

Civil Misc. Application No. 589/2024

अर्जदार : १. शेख बीलकिस शेख जब्बार, रा.प्लॉट नं. ७, मक्का मस्जिद, देवळाई, औरंगाबाद २. शेख नजीर शेख अजिज, रा.गल्ली नं. ८, वाणी हॉस्पीटल जवळ, संजय नगर, बायजीपुरा, औरंगाबाद ३. वझीर अझीझ शेख, रा.घर नं. ३-६-३१६, लेन नं. ८, संजय नगर, बायजीपुरा, औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरणं : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल 'केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे सुगराबी अजीज शेख यांचा दि.०४/०५/२०२४ रोजी मौजे भालगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत सुगराबी अजीज शेख यांना अर्जदारं नं. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत सुगराबी अजीज शेख यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कौणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २१/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: १०२/२०२४.

अर्जदार : १) गंगुबाई शिवाजी लांगे वयः ६० वर्षे धंदाः शेती, २) युवराज शिवाजी लांगे वयः ४२ वर्षे धंदाः शेती, ३) पुनम निंबाजी शिंदे वयः ३५ वर्षे धंदाः शेती, ४) भुषण शिवाजी लांगे वयः ३० वर्षे धंदाः शेती, ५) मंगल बबन सोनवणे वयः- ३२ वर्षे धंदाः शेती, ६) लहु शिवाजी लांगे वयः २५ वर्षे धंदाः शेती, सर्व रा. दस्तापुर ता. सोयगांव जि औरंगाबाद.

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. शिवाजी शंकर लांगे हे दिनांकः ११/१०/२०१७ ला मौजे, दस्तापुर ता. सोयगांव जि. औरगांबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः २३/०१/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः २१/१२/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहा. अधिक्षक.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सोयगांव, ता. सोयगाव जि.
औरंगाबाद.

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद

जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्रः- २१४/२०२४.

अर्जदार : १) मंगलाबाई माधव सरोदे वयः ६० वर्षे धंदाः- शेती, २) श्रीराम माधव सरोदे, वयः- ३७ वर्षे धंदाः- शेती, वरील सर्व रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ३) वैशाली कडुबा क्षीरसागर वयः ३४ वर्षे धंदाः शेती, रा. लोहारा ता. पाचोरा जि. जळगांव ४) रुपाली विजय घोंगडे वयः ३० वर्षे घंदाः शेती, रा. पहुर (कसबे) ता. जामनेर जि. जळगांव.

// विरूध्द //

गैरअर्जदार- निरंक

अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे माधव नारायण सरोदे यांचा मृत्यु दिनांकः २३/१०/२०२४ रोजी मौजे जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेल्या असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांकः- २३/०१/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः-२१/१२/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहा. अधिक्षक.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सोयगांव, ता. सोयगाव जि.
औरंगाबाद.

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्रः- २२३/२०२४.

अर्जदार : १) मिराबाई सिताराम वाघ, वयः ६० वर्षे, धंदाः- शेती. २) संतोष सिताराम वाघ, वयः- ३८ वर्षे, धंदाः- शेती. ३) निंबाजी सिताराम वाघ, वयः- ३५ वर्षे, धंदाः शेती. वरील अर्जदार रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ४) आशा नंदु लांडगे, वयः ३४ वर्षे, धंदाः शेती, रा. माळपिंप्री ता. जामनेर जि. जळगांव

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे सिताराम किसन वाघ हे दिनांकः १३/११/२०२४ ला मौजे जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद, येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणप्रत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- ०१/०२/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- २१/१२/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहा. अधिक्षक.
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सोयगांव, ता. सोयगाव जि.
औरंगाबाद.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ५९३/२०२४

अर्जदार : १. रूखमनबाई द्वारकादास शिंदे, वय. ७१ वर्ष धंदा. शेती २. बद्रीनाथ द्वारकादास शिंदे, वय. ५५ वर्ष धंदा. शेती रा. पिंपरखेडा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री. आर.जि. पवार यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ यांचे पति व २ यांचे वडिल नामे द्वारकादास भानुदास शिंदे हे दि. ०३/०१/२०२४ रोजी मौजे पिंपरखेडा ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत द्वारकादास भानुदास शिंदे यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत द्वारकादास भानुदास शिंदे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत द्वारकादास भानुदास शिंदे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्द्धीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत द्वारकादास भानुदास शिंदे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुट्टी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून
कनिष्ठ लिपिक सहायक अधिकक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ५९७/२०२४

पु.ता. २७/०१/२०२५

अर्जदारः १. कमल कचरू कुन्हाडे, वय ६५ वर्ष धंदा. शेती २. ज्ञानेश्वर कचरू कुन्हाडे, वय. ४१ वर्ष धंदा. शेती १ व २ रा. रांजणगांव पोळ ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. हिराबाई कडू राउत, वय. ३७ व

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी उद्या सामूहिक बैठक

तभा वृत्तसेवा
बीड दि.२२ डिसेंबर

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे श्रीमद् भागवत कथा व तुळशी पूजा नाम यज्ञ सोहळा

तभा वृत्तसेवा
बीड दि.२२ डिसेंबर

मकर संक्रांति महापर्वणी पर्वकाळ निमित्ताने तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे श्रीमद् भागवत कथा व तुळशी पूजा नाम सप्ताह चे आयोजन करण्यात आलेले आहे. ह भ प ज्योतिषाचार्य बबन देवा महाराज जोशी शिरस मार्गकर यांच्या अमृतमय वाणीतून दररोज रात्री ७ ते ९.३० या वेळेत श्रीमद् भागवत कथा व तुळशी पूजा नाम जप यज्ञ नारायणगड मठ पंढरपूर येथे या नाम सप्ताहाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आलेले आहे. या नाम सप्ताहामध्ये सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ११ ते २ तुळशी अर्चना पूजा २ ते ५संगीत भजन ६ वाजता हरिपाठ व सायंकाळी ७ ते ९ या वेळेमध्ये श्रीमद भागवत कथा संपन्न होणार आहे. भागवत कथेचा शुभारंभ दिनांक ८ /१/ २०२५ बुधवारी दुपारी पंढरपुर नगर प्रदक्षिणा करून भव्य दिव्य स्वरूपातभागवत कथा आरंभ होणार आहे.

पावित्र तीर्थ पंढरपुरी येथे भागवत कथा श्रवण करण्यचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा. या नाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता बुधवार दिनांक १५ १ २०२५ सकाळी ९ ते १ या वेळेत नारायणगड मठाचे महंत ह भ प प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने होऊन महाप्रसाद होणार आहे. या पावन पर्व काळामध्ये माता, भगिनी व महिला भक्तांनी जास्तीत जास्त सहभागी होऊन या तुळशी नाम यज्ञात सहभागी व्हावे तसेच श्रीमद् भागवत कथेचा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन या सप्ताहाचे नेतृत्व करणारे ह भ प धुराजी महाराज कोळेकर व ह भ प कृष्णा महाराज जोशी काका शिरसमार्ग यांनी केले आहे.या पंढरपूर येथे होणाऱ्या भागवत कथा व तुळशी पूजा नाम सप्ताह मधे सहभागी होण्यासाठी भाविक भक्तांनी ९८२२०३८७५७ या मोबाईल वर संपर्क साधावा असे महाराज कळवतात

बीड जिल्हात यंदा टमाटे लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे. गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील घेतलेले छायाचित्र (छाया-कृष्णा शिंदे)

जितेंद्र सिरसट यांना धमकी देणाऱ्या श्रीमती आघाव यांच्यावर कार्यवाही करा, माजलगाव पत्रकारांच्या वतीने मागणी

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ डिसेंबर

संपादक जितेंद्र सिरसट यांनी जिल्हाधिकारी गौण खनिज विभागातील गैरप्रकारा बाबत बातमी प्रकाशित केली होती. हीच बातमी जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातील महिला कर्मचारी यांना खूप झोंबली आणि या महिला कर्मचाऱ्यांनी वास्तवचे संपादक यांना धमकी देत एकेरी शब्द वापरले असल्याने याचा माजलगाव पत्रकारांच्या वतीने निषेध नोंदवत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

संपादक जितेंद्र सिरसाट यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याकडून एकेरी भाषा वापरत त्यांना धमकवण्यात आले याचा तीव्र निषेध करत माजलगाव तालुक्यातील पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले की, जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातील गैरप्रकाराबाबत संपादक जितेंद्र सिरसाट यांनी वास्तवतेची बातमी प्रसिद्ध करून जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातील महिला अधिकारी श्रीमती आघाव मॅडम यांना चांगलीच लागली असल्याने त्यांनी आपले भ्रष्टाचाराचे बिंग उघडे पाडल्याने आता आपली काहीच खैर नाही म्हणून संतापलेल्या या महिला अधिकाऱ्याने संपादक जितेंद्र सिरसट यांना सदरील महिला कर्मचारी यांना १९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी

४:०० च्या सुमारास जितेंद्र सिरसाट यांना भ्रमनध्वनी द्वारे मो. ८९७५०१८००० या क्रमांकावरून फोन केला पदाची गरिमा न ठेवत त्या म्हणाल्या कि तू आताची आता सांयकाळी ६:०० वाजेपर्यंत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ये नाही आला तर तुला उचलून आणण्याचा पर्याय आमच्याकडे आहे तू किती नीच आहेस अशी असभ्य भाषा वापरली. त्यामुळे या धमकीचे पडसाद संपूर्ण जिल्हात उमटले आहेत. पत्रकाराकडून या विषयी संताप व्यक्त केला जात आहे तरी संबंधित महिला कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी माजलगाव तालुक्यातील पत्रकाराच्या वतीने केली जात आहे. अशा आशयाचे निवेदन माजलगाव पत्रकारांच्या वतीने माजलगाव तहसीलदार व शहर पोलीस ठाणे माजलगाव यांना देण्यात आले आहे.

यावेळी तुकाराम येवले, उमेश मोगरेकर, उमेश जेथलिया, वैजनाथ घायतिडक कमलेश जाब्रस, हरीश यादव, सुभाष नाकलगावकर, महिंद्र मस्के, दिनकर शिंदे, किसन भदर्गे, परमेश्वर सोळंके, पृथ्वीराज निर्मळ, बाळासाहेब आडागळे, विष्णू उगले, वाजेद पठाण, हमीद शेख, ज्योतीराम पांढरपोटे, रवी उघडे, अमर साळवे, सुहास बोराडे, अनिकेत भिलेगावकर, सिद्धेश्वर गायकवाड, राजरतन डोंगरे, विजय कापसे, रत्नाकर कुलथे, दर्शन डोंगरे, रवी राऊत, धनंजय माने, राज गायकवाड, बालासाहेब उफाडे, राम जगताप, अरविंद ओव्हाळ आदि पत्रकार बांधव उपस्थित होते.

निराधारांना मिळणार संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचा लाभ

आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश

तभा वृत्तसेवा
बीड दि.२२ डिसेंबर

बीड तालुक्यातील अनेक निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांच्या रखडलेल्या मंजुरी अखेर झाल्या असून नवीन लाभार्थ्यांची यादी तयार झाली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.

निराधार वयोवृद्ध नागरिक यांना निर्वाहासाठी निधी देणारी श्रावणबाळ योजना तसेच निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, दिर्घ आजार, घटस्फोटीत स्त्रिया इत्यादी दुर्बल घटकांना आर्थिक मदत पुरवणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि अशाप्रकारच्या इतर योजनांच्या समितीची गेल्या अनेक दिवसांपासून बैठक झाली नव्हती, त्यामुळे गोरगरीब आणि गरजू या योजनांच्या लाभापासून वंचित होते. बर्याच दिवसांपासून प्रस्ताव आणि अर्ज दाखल करून देखील लोकांना लाभासाठी प्रतिक्षा करावी लागत होती. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करून, बैठका घेऊन संबंधित यंत्रणा व योजना समितीच्या बैठका घेऊन नवीन पात्र लाभार्थी यादीत समाविष्ट करून पात्र आणि गरजूंना लाभ देण्यासाठी निर्देशीत केले होते. यावर आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील ग्रामीण भागातून असलेल्या १२९ व शहरातील ९७ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच संजय गांधी निराधार पेन्शन योजनेंतर्गत शहरातील ७६ व ग्रामीण भागातील ११२ पात्र आणि गरजू लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली सदरील योजनांची बैठक होऊन नवीन लाभार्थींचा योजनेच्या यादीत सामावेश केला गेला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून वंचित असलेल्या गोरगरीब, निराधार, दुर्बल घटकांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान ज्या लाभार्थ्यांचे अर्ज त्रुटीत पडले आहेत, त्यांनी लवकरात लवकर त्रुटीपूर्तता करावी असे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री बावनकुळे यांच्या सत्कार करून त्यांना शुभेच्या देताना भारतीय जनता पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे, उपाध्यक्ष संदीप नागरगोजे, किरणजी काळे

श्री मंगलनाथ मल्टिस्टेट ची दिनदर्शिका प्रकाशित

श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर यांच्या शुभ हस्ते झाले प्रकाशन

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ डिसेंबर

दि.२० डिसेंबर २०२४ रोजी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न झाला.संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्री.ष.ब.१०८ चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते दिनदर्शिका २०२५ चे लोक प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष आर.जी.कानडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्थेला २५ वर्ष पूर्ण झाली आहेत.सभासदांना संस्थेच्या विविध योजनांची माहिती व्हावी व दिनदर्शिकेचा देखील लाभ सभासदांना घेता यावा करिता संस्था गेली २५ वर्षांपासून अखंडित परंपरागत दिनदर्शिकेचे प्रकाशन करत आहे. त्याच बरोबर सर्व सभासदांना सदरील दिनदर्शिका घरपोच दिली जाणार आहे. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांनी वचन, निष्ठा व समाजसेवा या घालून दिलेल्या तीन बंधननावरती संस्था कार्य करत असल्यामुळे संस्थेला आज यशस्वी २५ वर्ष पूर्ण झाली. त्यांचा आशीवार्द संस्थेच्या सदैव पाठीशी आहे.

संस्थेचे आज रोजी ५५० कोटी पेक्षा अधिक व्यवसाय असून ३११ कोटी ठेवी व २३२ कोटी पेक्षा अधिक कर्ज वाटप आहे. त्यामध्ये १२५ कोटी पेक्षा अधिक सुरक्षित सोनेतारण कर्ज वाटप आहे व एकूण कर्जाच्या ९९.०८ टक्के कर्ज हे सुरक्षित असल्यामुळे सभासदांच्या ठेवी या सुरक्षित आहेत.

संस्थेने स्थापनेपासून केवळ व्यवसाय वाढ व अधिकाधिक नफा मिळवणे हे उदिष्ट न ठेवता सभासद सेवा व सभासदांच्या ठेवीना सुरक्षितता या बाबींना नेहमीच प्राधान्य दिले आहे. यापुढे देखील संस्था सुरक्षिततेला प्राध्यान्य देऊनच काम करणार आहे असे आश्वासन दिले. याप्रसंगी संस्थेचे संचालक सुधाकर गुळवे, व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे, संस्थेचे मुख्य सरव्यवस्थापक भिसे दत्तात्रय, नारायण शेंडगे, वरिष्ठ अधिकारी सचिन कैलासे, राहुल काटकर, अमोल पांडे, विकास पाटील इत्यादी उपस्थित होते.

नोंद

शंतनु चिंचाळकर

एक देश, एक निवडणूक अतार्किक, की...

निवडणुकांमध्ये वापरली जाणारी शासकीय यंत्रणा आणि श्रमशक्ती हा देखील चिंतेचा विषय आहे. देशातील सर्व निवडणुका एकाच दिवशी किंवा विशिष्ट कालमर्यादित घेण्याचा सरकारचा विचार आहे. यासंदर्भातील विधेयकांचे मसुदे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केले आहेत. त्याद्वारे दर पाच वर्षांनी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच सर्व २८ राज्यांच्या आणि आठ केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे हा सर्वांत उल्लेखनीय प्रस्ताव आहे. संसदीय पॅनेलच्या चर्चेत विचारविनिमय केलेल्या अंदाजानुसार लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांसाठी भारतीय निवडणूक आयोगाला ४,५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येतो. हा केवळ सरकारी खर्चाचा आकडा आहे. राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी केलेला घोषित आणि अघोषित खर्च इतकाच असू शकतो. एकाच वेळी निवडणुका घेतल्याने दीर्घकाळात खर्च कमी होईल आणि विविध निवडणुकांमुळे देशाचे वेगवेगळे भाग बराच काळ आदर्श आचारसंहितेच्या कक्षेत राहणार नाहीत, असे सरकारचे मत आहे.

संसदीय स्थायी समितीने लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस केली आहे. विधानसभा निवडणूक तारखेपासून सहा महिने ते एक वर्षाच्या कालावधीपूर्वी किंवा नंतर संपलेल्या सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकत्र घेतल्या जाऊ शकतात. संसदीय पॅनेलच्या मतानुसार त्यासाठी काही विधानसभांचा कार्यकाळ कमी करावा लागेल, तर उर्वरित निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी वाढवता येतील. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी आयोग कायदेशीर तरतुदींनुसार निवडणुका घेण्यास तयार असल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. याबाबत अभ्यास समितीने अहवाल सादर केल्यावर सार्वजनिक क्षेत्रात आणि संसदेत विस्तृत चर्चा केली जाईल आणि त्याद्वारे सर्व शक्यता आणि अडचणींचा अभ्यास होईल. 'वन नेशन, वन इलेक्शन' हा उपक्रम पुढे नेण्यासाठी केंद्र सरकारने राज्यघटनेत दुरुस्ती करण्यासाठी विधेयक मांडले आहे. समितीच्या अहवालानुसार प्रस्तावित घटनादुरुस्ती विधेयक लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या तरतुदीशी संबंधित आहे. याद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या कार्यकाळाच्या समाप्तीशी संबंधित कलम ८२ मध्ये उप-कलम (२) समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. कलम ८३ (२) मध्ये सुधारणा करून 'एकाच वेळी निवडणुका' या शब्दांचा समावेश करण्याशी संबंधित तरतुदी केल्या आहेत. या विधेयकाला किमान ५० टक्के राज्यांच्या मंजुरीची गरज असणार नाही, असे शिफारशींमध्ये म्हटले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगांशी सल्लामसलत करून निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या तयार करण्यासंबंधी घटनात्मक तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचाही प्रयत्न केला जाईल. विधानसभेसह केंद्रशासित प्रदेशांशी (पुदुचेरी, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर) संबंधित तीन कायद्यांच्या तरतुदींमध्ये सुधारणा केली जाईल; जेणेकरून या सभागृहांचा कार्यकाळ इतर विधानसभा आणि लोकसभांशी जोडला जाऊ शकतो. सुधारणा करण्याचा प्रस्ताव असणाऱ्या कायद्यांमध्ये गव्हर्नमेंट ऑफ नॅशनल कॅपिटल टेरिटरी ऑफ दिल्ली ॲक्ट, १९९१, केंद्रशासित प्रदेश सरकार कायदा, १९६३ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९ यांचा समावेश आहे. या प्रस्तावित विधेयकाला राज्यघटनेत बदल करण्याची आणि राज्यांच्या मान्यतेची गरज नाही. घटनात्मकदृष्ट्या ईसी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने संसदेच्या सभागृहात अलिकडेच 'एक देश, एक निवडणूक' विधेयक मांडले. दर चार-सहा महिन्यांनी ठरावीक विधानसभा तसेच इतर निवडणुका पार पडत असल्याने होणारी जनतेच्या पैशाची उधळपट्टी थांबवण्याच्या दृष्टीने तसेच आचारसंहितेचा फास कमी होण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. मात्र त्याचे अनेक पदर संसदेतील चर्चेनंतर समोर आले.

(राष्ट्रीय निवडणूक आयोग) आणि एसईसी (राज्य निवडणूक आयोग) या स्वतंत्र संस्था आहेत. निवडणूक आयोगाकडून राष्ट्रपती, उपाध्यक्ष, लोकसभा, राज्यसभा, राज्य विधानसभा आणि राज्य विधान परिषदेच्या निवडणुका घेण्यात येतात. राज्य निवडणूक आयोगाला नगरपालिका आणि पंचायतीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा अधिकार आहे. या विधेयकामध्ये नवीन कलम ३२४ जोडून लोकसभा आणि राज्य विधानसभा तसेच नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची तरतूद केली गेली आहे.

सत्ताधारी भाजपा आणि त्यांचे जनता दल युनायटेड, टीडीपी, शिवसेना असे मित्र पक्ष एकाच वेळी निवडणुका घेण्याचा प्रयत्न करत असताना काँग्रेससह एसपी, एएपी, सीपीएम, एआयएमआयएम, उद्धव ठाकरे गट यासारख्या विरोधी पक्षांनी या कल्पनेला विरोध केला आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या प्रस्तावाद्वारे मोदी 'वन नेशन, नो इलेक्शन' या ध्येयाप्रत वाटचाल करत आहे, असे म्हणत खिल्ली उडवली आहे. एकाच वेळी निवडणुका घेणे लोकशाहीमध्ये व्यावहारिक नाही आणि वास्तविक मुद्यांवरून लक्ष वळवण्यासाठी ते आणले गेले आहे, या कारणावरून ते अमान्य केले. विरोधकांच्या मते निवडणुकांवेळी पुढे येणाऱ्या प्रश्नांना उत्तरे मिळत नाहीत, तेव्हा खऱ्या मुद्यांवरून लक्ष हटवण्यासाठी असे विषय पुढे आणले जातात. केंद्र सरकार लोकांचे मन मूलभूत मुद्यांपासून विचलित करण्याचा आणि संघराज्य रचनेचा आत्मा चिरडण्याचा प्रयत्न करत आहे. भारतातील अनेक प्रादेशिक पक्षांसाठी हे नुकसानकारक ठरेल आणि अविश्वास प्रस्ताव मांडण्याची तरतूद रद्द करावी लागेल, या शक्यता व्यक्त करून अनेक विरोधी पक्षांनी या योजनेला जोरदार विरोध केला आहे. या हालचाली अध्यक्षीय सरकारच्या दिशेने वाटचाल करण्याचा एक भाग असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. अशा निर्णयाद्वारे सरकार जनतेप्रति असलेली आपली जबाबदारी झटकण्याच्या प्रयत्नात आहे असेही विरोधी पक्षांनी म्हटले आहे.

विरोधकांच्या मते, अविश्वासदर्शक ठराव मंजूर होऊन सरकार पडल्यास केंद्र सरकार राष्ट्रपती राजवट आणणार का आणि पुढील निवडणुकीपर्यंत केंद्र सरकार राज्यपालांच्या माध्यमातून सरकार चालवणार का, हे प्रश्न अनुत्तरित आहेत. त्याबाबत केंद्राकडून स्पष्टीकरण मिळणे गरजेचे आहे. समाजवादी पक्षाने एकाच वेळी मतदानाच्या हालचालीला पाठिंबा दिला परंतु या विषयावर सर्वपक्षीय चर्चा होण्याची मागणी केली. राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज झा म्हणाले की, देशात नेहमीच 'एक राष्ट्र, एक निवडणूक' पद्धत अमलात होती. १९६२ नंतर एकलपक्षीय वर्चस्व संपुष्टात आल्याने आणि अनेक प्रादेशिक पक्षांनी राज्यांमध्ये सरकार स्थापन केल्यामुळे ही व्यवस्था खंडित झाली. यापूर्वी केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन् यांनी आरोप केला होता की एक देश, एक निवडणूक ही संकल्पना भारताची संघराज्य संरचना कमकुवत करण्याचा तसेच केंद्र सरकारला याबाबतचे पूर्ण अधिकार प्रदान करण्याचा हा छुपा अजेंडा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाला संविधान बदलण्याच्या प्रयत्नातून आरोपांमुळे काही धक्क्यांचा सामना करावा लागला. त्यातून या पक्षाने कोणताही धडा घेतलेला नाही तसेच संघ परिवार भारताच्या निवडणुकीच्या राजकारणाला अध्यक्षीय पद्धतीकडे नेण्याचा छुपा प्रयत्न करत आहे. भारतीय संसदीय लोकशाहीचे वैविध्यपूर्ण स्वरूप नष्ट करण्यासाठी एक देश, एक निवडणूक ही घोषणा तयार करण्यात आली आहे, असे पिनाराई विजयन् म्हणाले होते.

भारतातील प्रत्येक राज्याची स्वतःची विशिष्ट परिस्थिती आणि पृष्ठभूमी आहे. या मतभेदांकडे दुर्लक्ष केल्याने आणि राज्यांमध्ये उद्भवणाऱ्या राजकीय समस्यांचा विचार न करता यांत्रिक पद्धतीने निवडणुका घेतल्याने एक तर सक्तीची केंद्रीय सत्ता येईल किंवा लोकांचा जनादेश कमी होईल आणि शेवटी लोकशाहीचा नाश होईल, ही भीती विरोधकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. एक देश, एक निवडणूक हा निर्णय देशासाठी एका अर्थाने फायदेशीर असेल, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. मात्र यामुळे स्थानिक पातळीवरचे पक्ष आणि मुद्दे बाजूला पडतील. मात्र, तरीही एकत्र निवडणुका घ्यायच्या असल्यास संविधानात बदल करावा लागेल. सर्वप्रथम या कायद्याकडे 'थ्री एम आणि वन डी' या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. निवडणुकांमुळे बराच वेळ आचारसंहिता लागलेली असते. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यास अडचणी येतात. परिणामी, विकास खुंटतो. एक देश, एक निवडणूक या उपक्रमाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे मतदानाची टक्केवारी वाढेल. एकाच वेळी सर्व प्रमुख निवडणुकांसाठी मतदान करता येणार असल्याने मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल. कुठल्याही निर्णयाचा फायदा असतो तसे नुकसानदेखील असते. त्यानुसार, या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास देशातील संघराज्य व्यवस्था धोक्यात येऊ शकते. लोकसभेसोबत इतर निवडणुका घेतल्यास स्थानिक विषयांवर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाजूला पडतील. राष्ट्रीय पक्षांचा अजेंडा राबवला जाईल. स्थानिक पक्ष, राज्य पातळीवरील पक्ष दूर लोटले जातील. त्यामुळे त्याला विरोध केला जात आहे. शिवाय घटनेत बदल करण्यासाठी एकूण ३६४ खासदारांच्या मतांची गरज आहे. मात्र सत्ताधारी पक्षाकडे केवळ २९२ खासदार आहेत. त्यामुळे हे विधेयक कसे संमत होते, हे पाहणे महत्त्वाचे असेल. ■

श्रद्धांजली...

पं. सुरेश तळवलकर

अधिकारात्मक दृष्टिकोन हरपला

झाकिरभाई गेले, यावर विश्वास बसणे कठीण आहे. त्यांना मी त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून ओळखतो. प्रथम ऐकले तेव्हा त्यांचे वय अवघ्या पाच वर्षांचे होते आणि तेव्हा मी आठ वर्षांचा होतो. भेटीचा तो प्रसंग गिरगावातील एक कार्यक्रमाचा होता. त्या काळी बैठकीची अतिशय प्रसिद्ध जागा असणाऱ्या लक्ष्मीबाग भटवाडीमध्ये उस्ताद थिरकवा साहेबांच्या गुरूंची पुण्यतिथी साजरी होत असे. त्यानिमित्ताने अल्लारखा साहेब पाच वर्षांच्या झाकिरला घेऊन आले होते. पण इतक्या लहान वयातही झाकिरने असे काही वाजवले होते की, ऐकणारे मंत्रमुग्ध झाले. त्या वयातही प्रेक्षकांना, जाणकारांना आपल्याकडे खेचून घेण्याची त्यांच्यातील अफाट ताकद स्पष्ट जाणवली होती. तीच या वर्षीच्या जुलै महिन्यात ७३ व्या वर्षी सादर केलेल्या कार्यक्रमातही कमी झालेले नव्हती हे विशेष. त्यांच्या ऊर्जेत कधीच तिळमात्र फरक दिसला नव्हता. वेळेनुसार ज्ञान वृद्धिंगत होते. तसे त्यांचे ज्ञान वृद्धिंगत तर होतच राहिले परंतु, वाढत्या वयाप्रमाणे ऊर्जाशक्ती कमी होण्याचा नियम मात्र त्यांना कधीच लागू पडलेला दिसला नाही. असा हा थोर कलाकार आपल्यातून निघून गेल्याचे दुःख खूप मोठे आहे.

त्यांच्या आठवणी किती सांगाव्या...! मला भावणारी सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे त्यांचे कलेतील समर्पण. इथे मी समर्पण हा शब्द अगत्याने वापरतो आहे. कारण कला मनुष्याच्या ऊर्मीतून येते. मात्र याची दुसरी आणि नकारात्मक बाजू 'मी हे करतोय' अशा अहंगंडाचीही असते. एकदा कलाकारामध्ये हा दंभ जाणवू लागला की अभिमान, गर्व आदी अनेक गोष्टी सहजी येऊ लागतात आणि कलाकार त्यात वाहवत जाऊ लागतो. मात्र झाकिरभाईंच्या व्यक्तिमत्त्वाला कधी अशा नकारात्मकतेचा साधा स्पर्शही झाला नाही. त्यामुळेच एकाअर्थी ते समर्पणात्मक आयुष्य जगले. आपल्याला मिळालेली प्रसिद्धी, पैसा, वलय यातील कशाचाही अभिनिवेश त्यांच्यामध्ये दिसला नाही. त्यांच्याकडून प्रत्येक कलाकाराने शिकावी अशीच ही गोष्ट म्हणावी लागेल. अत्युच्च पदावर गेल्यानंतरही जमिनीशी कसे जोडलेले राहता येते, हे त्यांच्याकडे बघून वेळोवेळी शिकायला मिळाले.

कलेत तर हा माणूस अत्युच्चपदी होता. एखाद्याला अचंबित करणारी गोष्ट त्यांच्या हातून इतक्या सहजतेने निघून जायची की आपल्याला ती अद्याप का बरे जमत नाहीये... असा अनेक जण विचार करत बसायचे. एकीकडे हे सगळे असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर मात्र अत्यंत निरागस भाव असायचे. माझ्या मते, या साधेपणा आणि निरागसतेमध्येच त्यांच्या कलेचे मोठेपण भिजले होते. असे निरलस व्यक्तिमत्त्व शतकामध्ये क्वचितच घडते.

तबलावादनामध्ये सहा घराणी आहेत. या सगळ्यांवर झाकिरभाईंचा अधिकारात्मक दृष्टिक्षेप होता. त्यांना प्रत्येक घराण्याची मर्मस्थाने नेमकेपणाने माहिती होती आणि ती ते इतक्या ताकदीने प्रदर्शित करायचे की त्या त्या घराण्याच्या तबलावादकाला हे आपल्या घराण्यातील रचना वाजत असल्याचा सार्थ अभिमान, कुतूहल आणि त्याचबरोबर आश्चर्यही वाटायचे. हे इतके सगळे कसे काय करू शकतात? अशीच ऐकणाऱ्या जवळपास प्रत्येकाची भावना असायची. मुख्य म्हणजे आधी उल्लेख केल्याप्रमाणे प्रभुत्वाचा अभिनिवेश नसणे ही फार मोठी बाब होती. मला कायमच याचे नवल वाटत राहिलेले आहे. त्यांची प्रदीर्घ कारकीर्द पाहता असे वाटते की, तबल्याला समर्पित असणारा हा काही त्यांचा एकच जन्म नव्हता. त्यांचा मागील जन्मही तबल्यासाठीच राहिलेला असेल कारण एका जन्मात एवढे जमणे अवघड आहे. भारतीय

अभिजात संगीत परंपरेशी निगडित आहे. मात्र ती जपतानाच त्यांनी नवनवीन प्रयोगातही काही कमी ठेवले नाही. नवनिर्मितीमध्येही ते कायम अग्रेसर राहिले. जगाने दाद घ्यावी अशी नवनिर्मिती त्यांनी केली. तबला आणि इतर वाद्ये, तबला विथ मृदंग, तबला विथ वेस्टर्न ड्रम, तबला विथ गाणे, तबला विथ द्रुपद गायकी, तबला विथ कर्नाटक संगीत, तबला विथ पाश्चिमात्य संगीत असे सगळ्या प्रकारचे प्रयोग त्यांनी केले. त्यांनी केलेल्या प्रत्येक प्रयोगाची नक्कल करण्याचा मोह भल्याभल्यांना आवरला नाही. यापेक्षा एखाद्या कलाकाराच्या अभिव्यक्तीला, प्रयोगशीलतेला मिळणारी उत्तम दाद ती कोणती...! त्यांनी केलेल्या अशा बहुढंगी प्रयोगांमुळे, अफाट कामामुळे अनेक तबलावादकांचे चरितार्थ व्यवस्थित चालायला लागले. ही अतिशयोक्ती नव्हे तर वास्तव आहे. केवळ तबलावादकांचेच नव्हे तर तबल्याच्या परीघात येणारे कारागीर, संगीतकार, साथ करणारे, सोलो वादक, खुद्द झाकिरभाईंना साथ करणारे वादक अशा सर्वांमध्ये झाकिरभाई डोकावले नाहीत, असे कधी होत नाही. त्यांच्याकडून प्रेरणा घेत तबला शिकणाऱ्यांची संख्या किती मोठी असेल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

माझे त्यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. सांगायला लागलो तर यादी कितीही मोठी होऊ शकेल. या वर्षीच्या प्रारंभी ते पत्नीसह आमच्याकडे भोजनास आले होते. त्यांच्या सहवासात गेलेले चार-पाच तास आज प्रकर्षाने आठवत आहेत. आमच्या घरातील पुढच्या पिढीला त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले होते. केवळ आमच्याच कुटुंबातील कलाकारांचा नव्हे तर नव्या पिढीतील चांगले काम करणाऱ्या अनेक कलाकारांचे उल्लेख ते आपल्या बोलण्यात वेळोवेळी करत असत. तबलावादक यशवंत, योगेश समसी, अनुब्रत चटर्जी आदी कलाकारांचा उल्लेख करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात, प्रोत्साहन देण्यात त्यांनी कधीच काटकसर केली नाही. मुख्य म्हणजे या सगळ्यात कृत्रिमतेचा मागमूसही नसायचा. घरातील ज्येष्ठाने करावे तितक्या सहजतेने ते वादकांचे, चांगल्या कलाकारांचे कौतुक करत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही बाबही भावणारी होती.

शेवटी प्रसिद्धी मिळणे कठीण असतेच पण त्यापेक्षाही ती टिकवणे अधिक आव्हानात्मक असते. कारण ती डोक्यात जाणे अगदी स्वाभाविक आहे. ९९ टक्के लोक याला बळी पडतात. पण उरलेल्या एक टक्क्यामध्ये झाकिरभाईंचे नाव अग्रक्रमावर आहे. खाजगीतही ते वर्षभराने मोठ्या असणाऱ्या व्यक्तीच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घ्यायचे आणि हजारांच्या समुदायासमोर ही कृती करतानाही त्यांना कधी संकोच वाटायचा नाही. त्यांच्या या कृतीतून केवढे तरी शिकण्यासारखे आहे. मुळात कलाकाराला एवढे 'वाकता' येणे, हीच खूप मोठी बाब आहे आणि आपल्या सर्वांसाठी ही मोठी शिकवणही आहे. प्रसिद्धीच्या वलयात राहूनही वृत्तीतला साधेपणा आणि मातीतले पाय जपणारा असा माणूस आपल्यातून निघून गेला आहे. त्यांना विनम्र आदरांजली. ■

(लेखक प्रख्यात तबलावादक आहेत)

कलेत अमरत्व मिळवलेला कलावंत : पं. संजीव अभ्यंकर

उस्ताद झाकिर हुसैन आज आपल्यामध्ये नाहीत, यावर खरे तर विश्वासच बसत नाही कारण सध्याच्या काळात ७३ हे वय जगाचा निरोप घेण्याच्या दृष्टीने खूपच लहान आहे. अर्थात झाकिरभाईंनी या वयातच १०० वर्षांचे काम करून ठेवले आहे. त्यांच्या तबलावादनामध्ये इतके मोठेपण होते. सोलो वादन आणि गायन-वाद्य व नृत्याबरोबरची साथ असो वा सर्व तालवाद्यांमधील एकत्रित वादन असो... अशा पाचही प्रकारांमध्ये वाजवण्यासाठी एक वेगळ्या पद्धतीची मानसिकता लागते. महत्त्वाचे म्हणजे ती विकसित करावी लागते. यासाठी 'स्व'मागे ठेवून वाद्याची गरज कोणती आहे ते बघावे लागते. पूरकता काय वा कोणत्या पद्धतीचे वादन अपेक्षित आहे याचा विचार करून वाद्य वाजवण्याची गरज असते. खरे सांगायचे तर बोटावर मोजता येतील, इतक्याच कलाकारांना ही बाब समजली आहे आणि झाकिरभाई हे त्यातील अग्रणी नाव आहे. त्यांची चार पिढ्यांसमोर हा आदर्श ठेवला. स्वतः मागे राहून वाद्याला देवत्व प्राप्त करून देण्याचे काम त्यांनी केले. अर्थातच हे वाटते तेवढे सोपे नाही. यासाठी अंगी विनम्रता लागते. ती त्यांच्यामध्ये ठायी ठायी भरलेली होती. त्यामुळेच वर उल्लेख केलेल्या पाचही प्रकारांत त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. त्यांनी सोलो तबलावादन इतक्या वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आणि जगभर नेले की पुढील अनेक तबलावादकांना मोठमोठ्या व्यासपीठांवर संधी मिळत राहिली. याचे संपूर्ण श्रेय झाकिरभाईंना जाते. वेगवेगळ्या पदार्थांमध्ये साखर सहजतेने मिसळते, अगदी त्याचप्रमाणे झाकिरभाईंचा तबला विविध पद्धतीच्या, विविध स्वभावाच्या कलावंताच्या सादरीकरणात मिसळून जायचा. प्रत्येक गायकाची गायनपद्धती वेगळी असल्यामुळे साथ करताना साथीदाराला हे भान ठेवावेच लागले. झाकिरभाईंनी ते नेमकेपणे ठेवले. जसे की, नृत्य वेगवेगळ्या पद्धतीचे असते. तेव्हा नृत्याची निकड लक्षात घेऊन त्या पद्धतीने वादन बदलावे लागते. ही निकड झाकिरभाईंनी नेमकी जाणली. म्हणूनच ते पाचही पद्धतींना पूरक न्याय देत त्यात सहज मिसळून जाऊ शकले. जगभरातील कोणत्याही संगीतप्रकाराला चारचांद लावण्याची ताकद त्यांच्या याच वैशिष्ट्यामध्ये सामावलेली होती. वैयक्तिकदृष्ट्या सांगायचे तर आमचा सहवास जवळपास ४० वर्षांचा होता. त्यांना जवळून पाहता आले, अनुभवता आले, अनेकदा भेटता आले हे मी भाग्य समजतो. त्यांच्याकडून मी खूप काही शिकू शकलो. आता त्यांच्या जाण्याने एक न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. मात्र त्यांनी कलेत अमरत्वही मिळवले आहे. येणाऱ्या काळातही तबल्याशी संबंधित प्रत्येक बाबीमध्ये त्यांचेच नाव घेतले जाईल. ते चार पिढ्यांसाठी मापदंड होते आणि यापुढेही राहतील. त्यामुळेच जगातून निघून गेले असले तरी प्रत्येकाच्या मनामध्ये ते कायमच जिवंत असतील. ■

रविवारची पत्रे

नागपुरात आगळावेगळा आनंद अनुभवला पंढरीचा

मला आठवतं, समजायला लागले तेव्हापासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सामुदायिक प्रार्थनेसोबतच हरिपाठ म्हणायचे संस्कार माझे बाबा कर्मश्री दुर्गादास रक्षक यांनी परिवारात लावले होते. वारकरी संतांच्या मोठ्या प्रतिमा आमच्या बैठकीचा हॉल, ज्याला आम्ही देवघर, प्रार्थना मंदिर पण म्हणत असू, त्यात होत्या. त्या संत प्रतिमा बालमनातील वाईट विचारांवर वार करण्याच्या प्रेरणा देत होत्या. आमचं संयुक्त कुटुंब. वडिलांच्या सहा भावांचा परिवार म्हणून घर वाड्यासारखे, कुंभारी विटांच्या भिंती, मातीची जुडाई, लाकडाच्या मयाली, गरिबीला झाकत आमचं इंग्रजी कौलारू घर त्याच आणि लहानशा श्रीगुरुदेव किराणा भंडार त्याच घरात, त्या वास्तूचं उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले होते.

वारकरी संत विचार आणि पंढरपूरचे वारकरी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार माझ्या जीवन जगण्याचा प्रभाव आहे. तुकडोजी महाराजांचा गुरुकुंज आश्रमाचा परिसर जेथे माझं चौथ्या वर्गाचं शिक्षण झालं, तो परिसर जसा जीवन जगण्याची मला प्रेरणा देतो, तीच अनुभूती पंढरपूरमध्ये येणाऱ्या दिंड्या, पालख्यांच्या भाविकतेतून जाणवते. मी पहिल्यांदा विद्यार्थिदशेत पंढरपूरला वडिलांसोबत गेलो. तेव्हाच फक्त काही तास म्हणजे सकाळपासून रात्री काळोख्या मंदिरातील पांडुरंगाचं दर्शन घेतले. पण नंतर मात्र त्या गाभाऱ्यात पांडुरंग न शोधता वारीतल्या विठ्ठल-रुक्मिणीचं दर्शन मी पंढरपुरात घेत असतो. आता तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दांनी,

जीवा भावानं जव मी पाहिल । माझं गावच मंदिर शोभलं ।
विठ्ठल रुखमींनी घरीदारी । पुंडलीकही मुले गोजरी ।
त्यांना सेवेचे फुल मी वाहिलं । माझं गावच मंदिर शोभलं ॥
हेच तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी वारीचा प्रेरणादायी दिंडी

सोहळा नागपुरात खासदार सांस्कृतिक महोत्सवात याचि देही याचि डोळा अनुभवला. नागपूरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथील विश्व वारकरी महाविद्यालयाच्या भूमिपूजन समारंभात अशा आगळावेगळ्या कार्यक्रमाची भावना व्यक्त केली. त्या भावनेला संदीप कोहळे या तरुण वारकऱ्याने मनावर घेतले. दोन हजार सर्वसामान्य वारकऱ्यांना सोबत घेऊन, ताला सुरात टाळ-पखवाज- विणेचे झंकार वाजवत, वारकरी संतपंरपरा शब्दरूपाने मांडत, त्या विचारांना संतमंडळीच्या रूपात दाखवत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामांच्या कालखंडात वावरताना जणू त्यांच्या तोंडूनच प्रबोधन ऐकण्याचा भास होत होता.

कलाकृतीत ऐतिहासिक घटनांना पूर्ण न्याय देणे शक्य नसते. पण नामदेव, संत जनाबाई यांच्या कार्याची दखल घेतल्याशिवाय वारकरी संप्रदायाचं मर्म मानवी मूल्य, सामाजिक मूल्य आजच्या सामाजिक जीवनाला नवदृष्टी देण्याची कमतरता राहू शकते. त्याकाळी महाराष्ट्राचे संत नामदेव महाराज पंजाबपर्यंत पोहचतात. हिंदी भाषेत अभंग लिखाण करून शीख धर्माच्या 'गुरूग्रंथसाहिब' ग्रंथात मानाच स्थान प्राप्त करतात. नामदेवांच्या अभंगाचं पंजाबच्या घराघरात पठन ही वारकरी धर्माची विचार पताका यात दाखवता आली असती.

या कलाकृतीत तरबेज कलाकार मूठभर आणि सर्वसामान्य भक्तिमार्गाने प्रत्यक्ष जीवन ज़गणारे वारकरी मोठ्या प्रमाणात असून शिस्त, गांभीर्य पाळत मानवी जीवनाच्या आनंदाचा संदेश देत होते. अनेकांचे हात, मन, मनगट, मेंदू या पंढरीच्या सोहळ्याला नागपुरात साकारताना लागले. पण एक तरुण वारकरी या सर्व मागचा खरा सूत्रधार संदीप कोहळे याचे कौतुक करणे गरजेचे आहे. नागपुरात वारकरी प्रशिक्षण विद्यापीठ निर्मिती हे संस्कार केंद्र महत्त्वाचे कार्य यांच्याकडून घडत आहे.

ज्ञानेश्वर रक्षक/९८२३९६६२८२

●● ●●

बस प्रवाशांवर जास्तीचा बोझा लादू नका

सरकारने एसटी प्रवास भाडे कमी करण्यापेक्षा भरमसाट वाढ करीत आहे ही बाब सर्वसामान्य प्रवाशांना न झेपणारी आहे. प्रवासभाड्यात १ किंवा २ टक्के वाढ कोणीही मान्य करू शकते व सहन करू शकते. परंतु प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली परिवहन महामंडळ जर १४.९५ टक्के प्रवास भाडे करीत असेल तर ही बाब सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत चिंताजनक बाब आहे. प्रवाशांना किंवा नागरिकांना सुविधा देणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते. त्या पद्धतीने सरकारला नियोजन सुद्धा करावे लागते ही बाब सत्य आहे. परंतु सरकार जर अचानक १४.९५ एवढी भरमसाट वाढ करीत असेल तर असे म्हणायला हरकत नाही की सरकारने लागू केलेल्या अनेक योजनांची वसुली तर करीत नाही ना! प्रवाशांच्या सुविधांसाठी १ किंवा २ टक्के भाडेवाढ ठीक आहे. यातून महामंडळ चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करू शकते. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने १४.९५ भाडेवाढ यावर गांभीर्याने विचार करावा. कारण सरकार जेव्हा अनेक सुविधा नागरिकांना प्रदान करतात तेव्हा त्याचा प्रथम विचार करायला हवा. एसटी महामंडळाच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नव्या वर्षात ३५०० नव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहे ही आनंदाची बाब आहे व याचे स्वागतच. कारण राज्यात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे १४.९५ टक्के भाडेवाढ ही बाब बरोबर नाही. राज्यात एसटी महामंडळाच्या १४ हजार बसेस धावतात यात ३५०० नवीन बसेस येतील यामुळे प्रवाशांना सुविधा उपलब्ध अवश्य होईल यात नाही. परंतु प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून याचा संपूर्ण भुर्दंड प्रवाशांवर लादू नये. राज्यातील अनेक बसस्थानकांचा चेहरामोहरा बदलणार ही आनंदाची बाब आहे. परंतु सरकार जेव्हा अनेक योजना राबविते तेव्हा सरकारजवळ आपोआप पैसे येतात आणि जेव्हा प्रवाशांना सुविधा देण्याचा निर्णय सरकार घेते तेव्हा सरकार १४ .९५ टक्के भाडेवाढ करून सुविधा देण्याची गोष्ट करते हे योग्य नाही. एसटी प्रवाशांना सुविधा अवश्य द्या परंतु अवाढव्य भाडेवाढ करून नाही तर समतोल राखून. प्रवाशांना एसटी प्रवासात सवलत द्यायची सोडून सुविधांच्या नावाखाली भरमसाट वाढ करून गरीब प्रवासी, शेतकरी, सर्वसामान्यांना सरकार लुटते की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे. महामंडळाला एसटी प्रवाशांना खरोखरच सुविधा द्यायची असेल तर एखाद्या योजनेअंतर्गत द्यावी व एक किंवा दोन टक्के भाडेवाढ करून सरकारने प्रवाशांकडून मदत घ्यावी व एसटीचा आणि बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलवावा.

रमेश लांजेवार/नागपूर

●● ●●

संसदेतील राहुल गांधींचे वागणे बरे नव्हे!

'काँग्रेसची संसद भवनातील गुंडागर्दी' हा २१ डिसेंबरचा अग्रलेख वाचला. १३९ वर्षे वय असलेल्या काँग्रेस पक्षाची दुरवस्था होण्यासाठी गांधी-नेहरू परिवाराचा अहंकार, दुरभिमान, हेकटपणा, मस्तवालपणा आणि हम करे सो कायदा ही हीनवृत्ती कारणीभूत आहे. पंचावन्न वर्षे देशात एकहाती सत्ता असलेल्या काँग्रेसची अवस्था आज भीषण झाली आहे. वामपंथीयांच्या आणि अर्बन नक्षलवाद्यांच्या हातात गेलेल्या काँग्रेसला काही देशविरोधी विदेशी संस्थांची आणि उपद्रवी व्यक्तींचे आर्थिक साहाय्य मिळत असल्याचेही आरोप होत आहेत.

मुख्य म्हणजे देशातील या सर्वांत जुन्या पक्षाची अवस्था 'निर्नायकी' झाली आहे. राहुल गांधींसारख्या अपरिपक्व, बालिश इसमाकडे काँग्रेसचे सुकाणू सोपवणाऱ्या पक्षाची वाताहत होणार यात नवीन काय? देशासाठी कोणत्याही योजना, ध्येयधोरणे नसल्याने आज काँग्रेसचे नेते तात्कालिक मुद्यांवर गलिच्छ राजकारण करू लागले आहेत. काँग्रेसचे तोंडाळ आणि माथेफिरू प्रवक्तेही विविध प्रचारमा

स्वच्छ व सुंदर जालनासाठी लोकसहभाग गरजेचा -आ.अर्जुन खोतकर

जालना पालिकेत घेतली आढावा बैठक, अनेक मुद्यांवर चर्चा

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

उद्योगनगरी म्हणून परिचित असलेले जालना शहर आगामी काळात स्वच्छ आणि सुंदर शहर व्हावे, यासाठी लोकसहभाग गरजेचा असून पालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील आपले कर्तव्य बजावतांना त्यात शिस्त आणि सातत्य ठेवावे. शहर विकासासाठी वाट्टेल तेवढा निधी आपण खेचून आणून स्वच्छ आणि सुंदर जालना ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवू असे मार्गदर्शन नवनिर्वाचित आमदार आणि माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी शनिवारी जालना पालिकेत आयोजित आढाव बैठकीत सांगितले.

पालिकेच्या सभागृहात ही बैठक पार पडली. बैठकीस शहरातील उद्योजक, व्यापारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, जि.प.चे माजी अध्यक्ष अनिरूध्द खोतकर, पंडीतराव भुतेकर ज्येष्ठ विधिज्ञ ड.सुनील किनगावकर, माजी उपनगराध्यक्ष राजेश राऊत, ज्येष्ठ नगरसेवक अशोक पांगारकर, मिर्झा अनवर बेग, काँग्रेसचे नेते राजेंद्र राख, ड.राहुल हिवराळे, प्रा.राजेंद्र जाधव, , शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांच्यासह संध्या देठे, दिनकर घेवंदे , राहुल हिवराळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्योजक अर्जुन गेही, हेमंत ठक्कर ,अभय करवा, जेषठ पत्रकार सुरेश केसापुरकर हेही हजर होते.

प्रारंभी या बैठकीचे आयोजनाबद्दल आ.अर्जुन खोतकर यांनी माहिती दिली. उपस्थित वर नमूद केलेल्या मान्यवरांनी अनेक सूचना केल्या. बैठकीच्या शेवटीही आयुक्त संतोष खांडेकर यांनी जालना पालिका विकासासाठी करत असलेल्या विविध योजनांची सविस्तरपणे माहिती दिली.

जालना महापालिकेचे अनेक भूखंड हे महत्वाच्या जागांवर आहेत. शहरातील मध्यवस्तीत असलेल्या मालमत्तांचे संरक्षण करणे गरजेचे असून मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह आणि महात्मा फुले मार्केटची उभारणी गतीने व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करून ज्या कंत्राटदाराने शहरातील अंतर्गत जलवाहिनीचे काम केले आहे त्याची हायड्रोलिक चाचणी न घेताच बिल अदा केल्याबद्दल राऊत यांनी नाराजी व्यक्त केली.

शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावर ठिय्या मांडून बसतात. यामुळे वाहतूकीला अडचण होते. त्यासाठी या जनावरांकरिता कोंडवाडा करावा, अशी मागणी करून पालिकेत हिरकणी कक्ष स्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आज चार ते पाच महिला अधिकारी पालिकेत रूजू झाल्याने महिलांसाठी तो एक मोठा आधार असल्याचे त्या म्हणाल्या.

शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. अनेक भागांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून अतिक्रमणांचा विळखा वाढला आहे. शहरातील उद्योगांना विशेषकरून स्टील उद्योगाचा विचार केल्यास त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि महसूल मिळतो, परंतु येथून निघणाऱ्या धुराचे प्रदूषणही गंभीर बाब बनली आहे. या उद्योजकांना यावर उपाययोजना करण्यासाठी कडक निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा राजेंद्र राख यांनी व्यक्त केली. आपण उद्योगांच्या विरोधात आहोत असे नसल्याचेही ते म्हणाले.

जालना शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रथम अतिक्रमणे हटविणे गरजेचे असून ती श्रीमंताची असो की गरिबांची असा भेद न धरता प्रशासनाने कारवाई करावी, शहर विकासासाठी नेमके काय केले पाहिजे, याचा विकास आराखडा दहा वर्षापूर्वीच मंजूर आहे. त्या ३५० आरक्षणांपैकी पालिकेने केवळ दोन आरक्षणे विकसित केली आहेत. असे सांगून पाणीपुरवठा, स्वच्छता सुरळीत रहावी, यासाठी पालिकेकडे असलेला अपूरा कर्मचारीवर्ग ही देखील एक गंभीर बाब आहे. त्यामुळे पालिकेने नेमका त्यांना किती कर्मचारीवर्ग हवा आहे याचा प्रस्ताव तयार करून तो पाठवावा, असे सांगून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना आहेत, त्यातून काही कोटी रूपये हे शहर विकासासाठी मिळू शकतात, परंतु त्यासाठी अभ्यासपूर्ण आणि तांत्रिक दृष्ट्या सक्षम असलेल्या प्रस्तावांची निर्मिती करून त्या-त्या विभागाकडे सादर करण्याची गरज अंबेकरांनी व्यक्त केली. याबाबत त्यांनी नाशिक महापालिका आणि धुळे शहराचे उदाहरण दिले.

आज झालेल्या बैठकीमध्ये उद्योजक, व्यापारी आणि नागरिकांनी पाणीपुरवठा, स्वच्छता, वीजेचा प्रश्न यासह अनेक महत्वाचे मुद्दे मांडले. हे मुद्दे मांडतांना अनेक सूचनाही नागरिकांनी केल्या. त्या सूचनांची नोंद आपण घेतली आहे. आगामी काळात जालना शहराजवळील छत्रपती संभाजी महाराज उद्यानाजवळ १३० कोटी रूपये खर्च करून विपश्यना केंद्र तसेच नवीन नाट्यगृह आणि अन्य सुविधा उपलब्ध करून देणार आहोत.या बाबतचा परीपुर्ण प्रस्ताव जालना शहर महापालिकेने शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेला आहे.

यासह महात्मा फुले मार्केटचा प्रश्न शक्य तेवढ्या लवकर आपण सोडविणार असून यात न्यायालयीन प्रकरणे पुढे येऊ नयेत यासाठी आयुक्तांनी काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांसोबत मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृहाच्या उभारणीबाबत २६ डिसेंबर रोजी बैठक ठेवली असल्याचे ते म्हणाले. यासह सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ५० कोटींचा निधी तातडीने मिळणार असून यामुळे पालिकेला येणारे पाणी पुरवठ्याचे वीज बिल काही लाखांमध्ये कमी होणार असल्याचे ते म्हणाले. एकूणच पालिकेच्या ९५० कर्मचारी भरतीचा आकृतीबंध हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजीत पवार यांच्यासोबत मुंबईत बैठक घेऊन तोही मंजूर करून घेऊ, असे आश्वासन खोतकरांनी बैठकीनंतर मार्गदर्शन करतांना केले.

संक्षिप्त

प्रश्नमजुंषा स्पर्धेत कोळी सिरसगाव शोळेचे यश

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

साष्टपिंपळगाव याबाबत अधिक माहीती अशी की जिल्हा परीषद प्राथामिक शाळा भांबेरी येथे बिटस्तरीय प्रश्नमजुंषा स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन नालेवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री झाबंरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्राथामिक ६वी ते ८ वी गटातील विजेता संघ म्हणुन डोणगाव केंद्रातील कोळी सिरसगाव जि.प. प्रा.शाळेचा प्रथम क्रमांक आला तसेच प्राथामिक गटामधे वर्ग १ली ते पाचवी च्या संघामधे सुद्धा कोळी सिरसगाव शाळेने प्रथम क्रमांक मिळवीला .यावेळी श्री गोविंद चव्हाण गटशिक्षणअधिकारी अबंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन गोविंद चव्हाण गटशिक्षणअधिकारी अबंड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन श्री आटोळे (शिक्षण विस्तार अधिकारी) दिनेश शिंगारे (शिक्षण विस्तार अधिकारी) श्री आंबटकर केंद्रप्रमुख डोणगाव श्री पवार केंद्रप्रमुख शहागड ,श्री भापकर केंद्रप्रमुख वडीगोद्री,अशोक ढेरे गट समन्वयक श्री मेत्रे ,पवार सर,घोलप सर ,मस्के सर, श्री गणेश कुलकर्णी हे उपस्थित होते.या प्रश्नमजुंषा स्पर्धेचे गुणलेखक म्हणुन श्री आरगडे सर यांनी काम पाहीले तर टाईम कीपर म्हणुन श्री चव्हाण आय सीटी टीचर यांनी काम पाहीले, कार्यक्रमाचे सुत्रसचांलन श्रीमती अश्विनी बढे यांनी केले तर आभार प्रदर्शन गिरी सर मुख्याध्यापक जि.प.प्रा.शाळा भांबेरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी श्री चेके सहशिक्षक , चव्हाण सर,व सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली.

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिर; ५४ दात्यांचा सहभाग

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

स्वच्छतेचे जनक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त डेबूजी परिवार आणि गुरू - शिष्य परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरात सहभागी होऊन ५४ दात्यांनी रक्तदान केले. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून याही वर्षी डेबूजी परिवार आणि गुरू - शिष्य परिवाराच्या संयुक्त विद्यमाने जुना जालना भागातील महालक्ष्मी मंदिरात रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, संत गाडगेबाबा पुरस्कार वितरण आणि गुरू - शिष्य पुरस्कार वितरण आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात सहभागी होऊन अनेकांनी आरोग्य तपासणी केली. डेबूजी परिवार व गुरू - शिष्य परिवाराचे प्रमुख किशोर खंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हितेंद्र आगळे, सचिन शेलार, अरुण सूरसे, राजेश शेलार, मनीष जाधव, सुभाषराव घोडके, दीपक इंगळे, विनोद वाघ, अजय सूरसे, पवन इंगळे, शिवराज उजेड, रोहित इंगळे, दिनेश उजेड आदींनी परिश्रम घेतले.

राज्य महामार्ग जिंतूर जालना हायवे वर पथदिवे बसवण्यात यावेत

नगरसेविका सौ यमुना शेषनारायण दवणे यांची निवेदनाद्वारे प्रशासनास मागणी

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरा लगत जाणारा राज्य महामार्ग क्रमांक ७५२/१ जिंतूर जालना हायवेवर पथदिवे व गतिरोधक बसवण्यात यावेत अशा प्रकारच्या यांनी अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन नगरसेविका सौ. यमुना शेषनारायण दवणे यांनी प्रशासनास आज दिले असून त्यांनी खालील निवेदनात नमूद केले आहे की, राज्य महामार्ग जिंतूर जालना या रोडचे रुंदीकरण होऊन जवळपास एक ते दीड वर्षे पूर्ण झाले आहे ,राज्य महामार्ग जिंतूर जालना या रोडचे रुंदीकरण होऊन जवळपास एक ते दीड वर्ष पूर्ण झाले आहे.

सदरील रोडवर केवळ शोभेचे खांब उभे केलेले आहेत परंतु त्यावरील पथदिवे चालू नाहीत या रोडवर एकही गतिरोधक नाही त्यामुळे एका वर्षामध्ये तब्बल १४१ निष्पाप नागरिकांचा बळी या रोडने घेतलेला आहे ,या रोडवरील पथदिवे चालू करून गतिरोधक बसवण्यात आले

असते तर निश्चितच अपघाताचे प्रमाण कमी झाले असते. रोडवरील पथदिवे चालू करून गतिरोधक बसवणे या मागणी करिता नगरपंचायत कार्यालय व सार्वजनिक बांधकाम कार्यालय या दोनही कार्यालयाकडूनयापूर्वी अनेक वेळा अनेक नागरिकांनी मागणी केलेली आहे परंतु या दोन्ही कार्यालयाने अद्यापही एकही काम पूर्ण केलेले नाही. या १४१ निष्पाप नागरिकांच्या मरणास हे दोन कार्यालय जबाबदार आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की दोन दिवसापूर्वी विविध वर्तमानपत्रांमध्ये या महामार्गाबाबत नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार बांधवांनी केले होते त्या नंतर वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये रस्ते अपघात आटोक्यात आणण्याकरिता आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचे काम पत्रकारांनी सुद्धा केले होते त्यानंतर सुद्धा बुधवार रोजी वृत्तपत्रात बातमी येते ना येतेच की, १३९निष्पाप नागरिकांचा या मृत्यू मृत्यू झाला होता त्या नंतर आज पर्यंत १४१ अपघातग्रस्तांची संख्या वाढली असून सदरील राज्य महामार्गावर गतिरोधक व पथदिवे बसवून प्रशासनाने ठोस पाऊल उचलावे व आपल्या स्तरावरून आदेशित करावेत अशी मागणी मंठा तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार काळदाते साहेब व जालना येथील जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपंचायतचे प्रभारी मुख्याधिकारी इंगोले साहेब यांना नगरसेविका सौ.यमुना शेषनारायण दवणे यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत मागणी करण्यात आली.

श्वानांसह पाळीव प्राण्यांचे मोफत लसीकरण व आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जूना जालना, गांधी चमन परिसरातील समर्थ पेट शॉपतर्फे २२ डिसेंबर रोजी श्वान व इतर ४०० प्राण्यांचे लसीकरण व आरोग्य तपासणी श्वान प्रेमी नितीन इंगळे व डॉ.मुकूंद जमधडे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

१० व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सदरील लसीकरण व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी विविध जातीचे मांजर व श्वान,पाळीव जनावरांची मोफत आरोग्य तपासणी करून लसीकरण करण्यात आले.यावेळी समर्थ पेट शॉपचे संचालक नितीन इंगळे, डॉ. मुकुंद जमधडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी मॉ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब वानखडे, सुभाष पवार, धरम इंगळे लक्ष्मण वानखडे, सचिन वाघमारे, किरण गरड, सुनील पवार ,रामेश्वर जावळे ,अनिकेत वाघमारे, वैभव वानखेडे, सचिन वानखेडे, अनिकेत वाघमारे, रामेश्वर इंगळे, सचिन जैवळ यांच्यासह शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

अध्यात्म प्राप्तीसाठी संतांच्या संगती शिवाय पर्याय नाही

ह.भ.प,ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांचे कीर्तनातून निरूपण

तभा वृत्तसेवा
पारध/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील खडकेवाडी शेलुद येथे १८ डिसेंबर बुधवारी फिरती चतुर्थी निमित्त आयोजित कीर्तनाचे निरूपण करतांना ज्ञानेश्वर माऊली महाराज शेलूदकर म्हणालेकी, आजकाल प्रत्येक मनुष्य आपल्या जीवनामध्ये काहीतरी लाभ होण्यासाठी धडपड करीत आहे. कोणी आपला वैयक्तिक लाभ तर कोणी परमार्थिक लाभासाठी आणि परमार्थिक लाभ होण्यासाठी नेहमी संतांच्या संगतीत राहून संतांनी सांगितलेला मार्गावर तुम्ही चालत राहिला तर निश्चित अध्यात्मिक, परमार्थिक प्राप्ती तुम्हाला झाल्याशिवाय राहत नाही.

मराठवाडा विदर्भ संयुक्त या फिरती चतुर्थी उपक्रमांतर्गत मौजे खडकेवाडी शेलुद येथे चतुर्थीनिमित्त आयोजित

कार्यक्रमांमध्ये बोलत असताना महाराजांनी

हे तो एक संताठायी लाभ पायी उत्तम म्हणविता त्यांचा दास पुढे आस पुरेना

या जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण करत असताना महाराजांनी संत साहित्याचे अनेक दाखले देऊन परमार्थामध्ये नेहमी संतांनी सांगितलेला मार्गावर चालत राहिल्यास भगवंत प्राप्ती झाल्याशिवाय राहत नाही आणि त्यांचा दास झाल्यानंतर पुढे कुठलीच आस तुम्हाला शिल्लक राहत नाही. या प्रकारे अभंगाचे महत्त्व सांगितले.किर्तन प्रसंगी परिसरातील महाराज मंडळी, टाळकरी, वारकरी व समस्त गावकरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आनंदामध्ये पार पडला. किर्तन सेवेनंतर ह भ प विष्णु महाराज सास्ते यांनी गावकऱ्यांचे व महाराज मंडळीचे आभार मानले. व पुढील येणारी चतुर्थी धाड ता.जि.बुलढाणा येथे होणार असून धाड येथील मेडिकल असोसिएशनचा ऊबन्टु ग्रुप यांना उपस्थित महाराजांच्या वतीने श्रीफळ देण्यात आले.

वंचितच्या वतीने अमित शहा विरुद्ध जोडे मारो आंदोलन

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

केंद्रीय ग्रहमंत्री अमित शाह यांनी संसदेत विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी बोलतांना अपशब्द वापरात अपमान केला.त्याचा निषेध म्हणून भोकरदन येथे शनिवारी २१ रोजी रमाई नगर,नवे भोकरदन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर अमित शाह यांचा निषेध करत त्याच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचा त्वरित राजीनामा घ्यावा अशी मागणी केली.

दरम्यान, यावेळी तहसीलदार भोकरदन मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिल्ली येथे संसदेत केंद्रीय ग्रहमंत्री अमित

शाह यांनी महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अपशब्द वापरून अपमान केला आहे. यामुळे आंबेडकर प्रेमी जनतेच्या भावना दुखावल्या असून समाजात संतापाची लाट आहे.

लोकशाही च्या मंदिरात संविधान निर्मात्याला हा कमी लेखण्याचा प्रयत्न अमित शाह यांनी केला आहे. त्यांचे वक्तव्य हे संविधानिक पदाला अनुसरून नसून त्यांच्या पदाचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा अशी मागणी ही शेवटी करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विशाल मिसाळ,मंगेश पगारे,नितीन म्हस्के,सिद्धार्थ सोनवणे,सागर साळवे,अमोल भोंडे,ज्ञानेश्वर शेजूळ,कृष्णा निकाळजे, विजय पगारे,निलेश हिवाळे,नितेश सावंत,गौतम वाके कर, यशोदीप राऊत, अभिजित गायकवाड, नितीन जोगदंडे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करा - गोरंटयाल

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या आंदोलकाच्या मृत्यू प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मा.आमदार कैलास गोरंटयाल यांनी आज शनिवारी येथे बोलतांना केली आहे. परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी या आंदोलकाचा झालेला मृत्यू आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेचा निषेधार्थ आंबेडकरी संघटनांच्या वतीने आज शनिवारी जालना शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते.यावेळी शांतता रॅलीत सहभागी होत माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी उपरोक्त मागणी केली आहे. यावेळी ते म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी याच्या हत्येप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांना केवळ निलंबित करून चालणार नाही तर त्या पोलीस अधिकाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा तसेच मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देण्यात यावी अशी मागणी करत जालना बंदला प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी व्यापारी बांधवांचे आभार मानले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा धाराशिव भाजपच्या

तुळजापूर, दि.२२ डिसेंबर - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन दि.१७ डिसेंबर रोजी भारतीय जनता पार्टीचे धाराशिवचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील आणि भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे यांनी तुळजाभवानी देवीची कवड्याची माळ, शाल आणि देवीची चरण प्रतिमा देऊन सत्कार केला. धाराशिव जिल्ह्यातील विविध विकास कामाबद्दल यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विकासकामांना निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे सांगितले.

संक्षिप्त वृत्त...

बोळेगावमध्ये भारतीय सैनिक अविनाश सूर्यवंशी यांचा सत्कार

जळकोट, दि.२२ डिसेंबर - येथून जवळच असलेल्या मौजे बोळेगाव येथील इंडियन आर्मीमध्ये नुकतेच भरती झालेले जवान अविनाश आत्माराम सुर्यवंशी यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. अविनाश सुर्यवंशी यांनी देशाची प्रमाणिकपणे सेवा करण्यासाठी अथक परिश्रम घेवून इंडियन आर्मी दलात भरती होऊन नुकतेच आर्मीची ट्रेनिंग पूर्ण करून गावी आले असता ग्रामस्थांच्यावतीने सरपंच विलास पाटील व सतिश सुर्यवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रा.प.सदस्यअंकुश रुपनूर, सुनील सुर्यवंशी, पोलिस पाटील कडाजी सुर्यवंशी, सहशिक्षक आप्पाजी सुर्यवंशी, नागरबाई जाधव, संगिता सुर्यवंशी, महिला, युवक, ग्रामस्थ उपस्थित होते.

अहमदिया मुस्लिम युवक संघतर्फे श्री तुळजाभवानी क्रीडा संकुलात स्वच्छता

धाराशिव, दि.२२ डिसेंबर - अहमदिया मुस्लिम जमातची युवा शाखा मजलिस ख़ुद्दाम-उल-अहमदिया धाराशिवतर्फे श्री तुळजाभवानी क्रीडा संकुलात स्वच्छता कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमात स्थानिक क्रीडा अधिकारी, युवा मार्शल आर्ट ऍथलीट, आणि विविध समुदाय सदस्य तसेच शहरातील मान्यवरांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी क्रीडा संकुलातील प्लास्टिक कचऱ्याची स्वच्छता करण्यात आली तसेच पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुढील मान्यवर उपस्थित होते. डॉ.बशारत अहमद (अहमदिया मुस्लिम जमातचे अध्यक्ष), राग़ेब अलीम (ख़ुद्दाम-उल-अहमदिया शहराध्यक्ष), अब्दुल लतीफ (अन्सार उल्लाह जिल्हा अध्यक्ष), अब्दुल अलीम (अन्सार उल्लाह शहराध्यक्ष), कैलास लटके (क्रीडा अधिकारी), भैरवनाथ नाईकवाडी (क्रीडा अधिकारी), समाजिक कार्यकर्ते गणेश रानबा वाघमारे, मक़बूल अहमद (प्रचारक अहमदिया मुस्लिम जमाअत), बन्सोडे (माजी क्रीडा अधिकारी), मनोज पाटणगे (कराटे), सुरेश कळंबकर, तसेच, प्रभाकर जगदाळे, अब्दुल क़य्युम नासीर (चिटणीस वक़ार-ए-अमल), अब्दुस समद, अब्दुल नईम, नदीम अहमद, मुताहिर अहमद, सजील अहमद, आदिल अहमद, तौसीफ अहमद, शफीक अहमद, मंजुम अहमद ,अमित नागणे, राहुल बडवाणे, स्वामी सर, अशोक सावंत, साई, आदी सदस्य उपस्थित होते.

नवोदय विद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा

तुळजापूर, दि.२२ डिसेंबर - पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात रविवार दिनांक २२ डिसेंबर रोजी भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिन राष्ट्रीय गणित दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे यांच्या करकमला द्वारा श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी व्यासपीठावर वरिष्ठ अध्यापक एस.डी.खोब्रागडे, गणित अध्यापक व्ही.व्ही.कुलकर्णी, एस.आर.गजम, प्रमोद खरबास, निषाद भुते होते. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता. पार्थ कलशेट्टी व तनिष्का मगर या विद्यार्थ्यांने श्रीनिवास रामानुजन यांच्या कार्याविषयी आपले विचार व्यक्त केले. गणितीय दिनाचे औचित्य साधून गणितीय वारली कला प्रदर्शनी, गणितीय रांगोळी, प्रश्नमंजुषा या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. एस.आर. गजम यांनी अध्यापनातील गणिताचे महत्त्व यावर आपले विचार व्यक्त केले. शेवटी विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे यांनी भारतीय गणितज्ञ यांच्या विषयी विचार व्यक्त करताना श्रीनिवास रामानुजन यांनी प्रमेय व अनेक सूत्रे यांचे संशोधन करून अवघड गणित सोप्या पद्धतीने कसे शिकवावे हे दाखवून दिले. तसेच त्यांच्या गणिताचा सध्या संख्याशास्त्र, सॉफ्टवेअर, फिजिक्स शाखा मध्ये कसा होत आहे हे सांगून त्यांच्या गणितामध्ये अनोखेपण व सर्जनशीलता कशी होती. याविषयी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव कुलकर्णी तर आभार प्रदर्शन निषाद भुते यांनी केले.

तेरणा युथ फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची निवड

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ डिसेंबर - तेरणा युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील युवकांच्या अडचणी सोडविणे आणि आपल्या परिसराच्या विकासाला हातभार लावण्याचे काम सुरु आहे. गेल्या काही महिन्यातच युथ फाऊंडेशनला चांगलाच प्रतिसाद मिळाला असून येत्या काळात अनेक महत्त्वपूर्ण उप्रकम युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून राबवण्यात येणार आहेत. तेरणा युथ फाउंडेशनसोबत जोडल्या गेलेल्या युवकांचं जाळं आता धाराशिव जिल्ह्यात निर्माण होत आहे. यापैकी काही जणांची अध्यक्ष मेघ राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून विविध पदावर निवड करण्यात आली आहे. तेरणा युथ फाऊंडेशनच्या धाराशिव तालुका अध्यक्षपदी नितीन खंडागळे (ढोकी) मो.९१५८८६३२८२, उपाध्यक्षपदी प्रवीण शेटे (कोंड) मो. ९२७१८८८८१८ आणि धाराशिव शहराध्यक्षपदी गणेश इंगळगी(धाराशिव) मो. ७७४५८३११११ यांची निवड करण्यात आली आहे. तुळजापूर तालुका अध्यक्षपदी मेघराज बागल (सांगवी) मो.९६६५६९६२२९, उपाध्यक्ष सयाजी शिंदे(मंगरूळ) मो.८८८८३७१८३७ आणि तुळजापूर शहराध्यक्ष दिनेश पलंगे(तुळजापूर) मो. ९६६५३५०१३५ यांची निवड करण्यात आली आहे. नळदुर्ग शहराध्यक्षपदी अशीतोष नाईक व मुदसिर शेख यांची निवड करण्यात आली आहे.

गाव तिथे व्यायामशाळा

तेरणा युथ फाउंडेशनच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात 'गाव तिथे व्यायाम शाळा' उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यासाठी इच्छुक असलेल्या गावातील तरुणांनी युथ फाऊंडेशनकडे आपली मागणी नोंदवायची आहे. याकरिता ९४२०४६५५११ हा हेल्पलाइन नंबर देखील देण्यात आला आहे. तसेच अधिक माहितीसाठी श्री आसराम शिंदे मो. ९९८७६८०६७० व अविराज खांडेकर मो. ७६६६५८१४५१ यांना संपर्क करून शकता. जास्तीत जास्त गावांमध्ये हा उपक्रम राबवून तेथील तरुणांना शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीने सजग करण्यासाठी ही मोहीम हाती घेतल्याचे तेरणा युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष मेघ राणाजगजीतसिंह पाटील यांनी सांगितले.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी उपोषणकर्त्यांची घेतली भेट

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२२ डिसेंबर - तुळजापूर तालुक्यातील बारूळ गावात पवनचक्की उभारणी प्रकल्पाला विरोध केल्याने शेतकरी सचिन प्रभाकर ठोंबरे यांना ठेकेदाराने गुंडांच्या मदतीने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी दलाल गुंडांवर कोणतीही कारवाई केलेली नाही. याविरुध्दात शेतकरी कुंटूंब तुळजापूर येथे उपोषणास बसले आहे. या पिडीत कुंटूंबाची भेट आमदार राणाजगजितकसिंह पाटील यांनी घेतली.

या उपोषणकर्त्यांनी पोलिसांच्या अन्यायाचा निषेध करत गुंडांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तुळजापूरचे वादग्रस्त पोलीस निरीक्षक रवींद्र खांडेकर यांची तुळजापूरातून तातडीने बदली करून चौकशीअंती निलंबित करावे, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

पवनचक्की प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून यावर लवकरच कारवाई होवून त्या शेतकऱ्यांना न्याय देण्यात येईल, असे आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय मुख्याध्यापक बाबुराव पवार यांना प्रेरणा पुरस्कार

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२२ डिसेंबर - उमरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बालाजी नगर शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक बाबुराव पवार यांना सामाजिक न्याय, विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन, समाज कल्याण विभाग व जिल्हा परिषद धाराशिव च्या वतीने दिला जाणारा प्रेरणा पुरस्कार दिनांक ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

बाबुराव पवार हे शिक्षण क्षेत्रात गेली ३६ वर्ष ज्ञानदानाचे कार्य करत आहेत या प्रदीर्घ शैक्षणिक कार्यात दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल व महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे सल्लागार म्हणून काम करत असताना समाजातील गरजू व दिव्यांग बांधवांना सर्वतोपरी मदत करण्याचे काम त्यांच्या हातून झालेले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल उमरगा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके केंद्रप्रमुख शिला मुदगडे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे सोनाली वरवटे यांनी अभिनंदन केले.

वाढीव हद्द भागात मूलभूत सुविधांचा अभाव

नाल्या रस्त्यांचा अभाव गटारीचे सांडपाणी रस्त्यावर! नागरिकांचे आरोग्य धोक्यात... शहरातील अंतर्गत रस्ते विकासापासून वंचित! रहिवाशी नागरिक त्रस्त

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२२ डिसेंबर - नळदुर्ग रोडवरील नवोदय विद्यालयाच्या बाजूने असलेला आयटीआय आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अंतर्गत रोडची एवढी दुरावस्था झाली आहे की, येथील रहिवाशांना त्या रस्त्यावरून वावरताना नाकाला रुमाल लावून वावरावे लागते नाल्या रस्ता नसल्याने येथील रहिवाशांचे सांडपाणी रस्त्यावरच आलेले आहे हे पाणी रस्त्यावर साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे दुर्गंधी एवढ्या मोठ्या प्रमाणात पसरली आहे की येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नगरपरिषद प्रशासन जवळजवळ दहा वर्ष होऊनदेखील वाढीव हद्दीत विकासकामे करण्यामध्ये अयशस्वी झाल्याचे समोर येत आहे. वाढीव हद्दीतील नागरिक अनेक वर्षांपासून मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित आहेत. नाल्या रस्ते नसल्याने डासाचे प्रमाण वाढून या परिसरात डेंगूची साथ पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी काँग्रेस काटेरी झुडपे आणि गवत मोठ्या प्रमाणात वाढले असून सहा मीटर आणि नऊ मीटरचे रस्ते अक्षरशः पाऊलवाटेप्रमाणे दिसत आहेत. गवताचे प्रमाण वाढल्यामुळे या भागात इच्छुकाटे सापांचे प्रमाण देखील वाढल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना या घाणीतून बॅटरी घेतल्याशिवाय फिरता येत नाही. या रस्त्याला चिटकून असलेल्या कॉलनीचे सांडपाण्याचे पाईप नागरिकांनी त्यांच्या पाठीमागे असलेल्या या रोडवर सोडण्याचे दिसून येते त्यामुळे रस्त्यांना गटारीचे स्वरूप आले आहे.

शहरात नगरोत्थान महाभियानांतर्गत १५८ कोटी रुपयांचे विविध रस्ते विकास कामे चालू आहेत हे रस्ते नागरिकांची रहदारी नसणाऱ्या ठिकाणी चालू आहेत तर खरी गरज असणाऱ्या नागरिकांच्या वस्तीत गल्लीबोळात अंतर्गत रस्ते असे भाग वगळून रस्ता विकास कामे करत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये चांगल्याच नगरपरिषद विषयी रोष वाढला असून १५८ कोटीच्या कामांमध्ये शहरातील अंतर्गत रस्ते गल्लीबोळांना प्राधान्य देऊन असे रस्ते करावेत अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे. सदरील रस्त्यावरील काटेरी झुडपे गवत काढून रस्त्याच्या कडेने नालीच्या चारी काढाव्यात अशी मागणी येथील रहिवासी करत आहेत.

उत्पादन शुल्क विभागाच्या आशिर्वाद ? : राष्ट्रीय महामार्ग-ग्रामीण भागातील धाबे, हॉटेलवर खुलेआम दारु विक्री

नेहमीच्या सवयीप्रमाणे इक्साईजचे अधिक्षक गणेश बारगजे यांनी कॉल रिसीव्ह केलाच नाही....

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२२ डिसेंबर - उत्पादन शुल्क विभागाच्या आशिर्वादामुळे तुळजापुर तालुक्यात राष्ट्रीय महामार्गावरील धाबे, हॉटेल, बियर शॉपी यासह ग्रामिण भागातील हॉटेल व बियर शॉपी मध्ये खुलेआम देशी, विदेशी दारुची विक्री सुरु आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ याची दखल घेऊन याबाबत कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

अवैध दारू विक्रीला आळा घालणे हे उत्पादन शुल्क विभागाचे मुख्य काम आहे. मात्र तुळजापुर तालुक्यातील उत्पादन शुल्क विभाग कोणते काम करीत आहे हे समजत नाही कारण आज राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल, धाबे तसेच बियर शॉपीमध्ये खुलेआम देशी, विदेशी दारूची विक्री सुरु आहे. तसेच ग्रामिण भागातही आज खुलेआम हॉटेल तसेच बियर शॉपीमध्ये खुलेआम देशी, विदेशी दारूची विक्री सुरु आहे. उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी छापे मारायला येतात मात्र जाताना थातुरमातुर कारवाई करुन आपले खिशे गरम करुन निघुन जातात. यामुळे अवैध दारू विक्रीला आळा बसण्याऐवजी ही विक्री वाढत चालली आहे. इतकेच नव्हे तर अनेक ठिकाणी बनावट दारुही विकली जात आहे.

अनेकदा उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी कारवाईसाठी येतात मात्र कारवाईत मिळाललेली संपुर्ण दारू जप्त न करता कागदोपत्री ती कमी दाखविली जाते यामागचे गौडबंगाल काय आहे याची चौकशी उत्पादन शुल्क विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी करणे गरजेचे आहे त्याचबरोबर छाप्यात दारू मिळाल्यानंतर मुख्य व्यक्तीवर कारवाई न करता त्या हॉटेल, बियर शॉपीमधील वेटरवर कारवाई करुन मुख्य व्यक्तीला अभय देण्याचे काम अनेकदा या धाड मारण्यासाठी आलेल्या उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे.

आता ३१ डिसेंबर येत आहे ३१ डिसेंबर रोजी तर या अवैध दारू विक्रीला मोठे उधाण येते त्यामुळे आतापासुनच उत्पादन शुल्क विभाग अलर्ट मोडवर राहणे गरजेचे आहे. यावेळी परराज्यातुन बनावट दारू येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ऊसवाहतुक ट्रॅकटरवरील टेपच्या आवाजामुळे इतर वाहनांना त्रास?

खामसवाडी, दि.२२ डिसेंबर - कळंब तालुक्यातील सर्व साखर कारखाने, गुळ कारखाने जोमाने चालु आहेत. ऊस वाहतूक करणारी अवजड वाहने अनेक रस्त्यांनी मार्गावर वाहतूक करताना दिसत आहेत. मात्र, काही मुजोर चालक ट्रॅकटरवरील टेपचा फुल आवाजात ऊसवाहने चालवताना दिसत आहेत. ट्रॅकटर वरील टेपच्या मोठ्या आवाजामुळे मागील वाहनाने वजवलेला हॉर्न ट्रॅकटर चालकाला ऐकू येत नसल्याने मागील वाहनांना पुढे जाण्यास मज्जाव होत आहे. अनेक ऊसट्रॅकटर चालवणारे चालक अल्पवयीन, बिगर परवान्याचे असलेलं ज्वलंत चित्र पहायला मिळत आहे.

कळंब तालुक्यातील सर्वच ऊस कारखाने चालू असून ऊस वाहतूक सगलीकढे चालु आहे. ऊसवाहतुक करणारे ट्रक, टिप्पर आरश्याच्या आधाराने इतर वाहनांना साइड देतात. ऊस ट्रॅकटर टेपच्या फुल आवाजामुळे इतर वाहनांना रस्ता देण्यास विलंब लावतात एक ते दिड किलोमीटरपर्यंत इतर वाहनांना पुढे जाण्यास त्रासदायक होते. ग्रामीण भागातील खामसवाडी, मोहा आदी ठिकानी कारखाने असून अरुंद रस्ते असल्यामुळे ऊसवाहतुक जबाबदारीने करणे महत्वाचे आहे. अशा ट्रॅक्टर चालकांना टेपचा आवाजाची तीव्रता कमी करण्याच्या सुचना पोलीस यंत्रणेने, ऊस कारखाना प्रशासनाने देण्याची मागणी होत आहे.

ध्वजदिन निधीसाठी सढळ हाताने मदत करा : जिल्हाधिकारी डॉ.मैनक घोष

ध्वजदिन निधी संकलन मोहिमेचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ डिसेंबर - देशाच्या संरक्षणासाठी सीमेचे सैनिक कायम कार्यरत असतात.या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वजदिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे.आपण प्रत्येकाने आपला अधिकाधिक सहभाग देवून सैनिकांच्या विविध कल्याणकारी योजना तयार करण्यासाठी ध्वज दिन निधी संकलित करण्यासाठी सढळ हाताने मदत करावी. असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.मैनक घोष यांनी केले.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने आज २० डिसेंबर रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे सशस्त्र सेना ध्वजदिन - २०२४ निधी संकलनाचा शुभारंभ मान्यवरांनी वीर जवान ज्योतीस

पुष्पांजली अर्पण करून दीप प्रज्वलनाने केला.

यावेळी सशस्त्र सेना ध्वज दिन संकलनात महत्वपूर्ण सहभाग देणाऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांना सशस्त्र सेना दिवसाचे बॅचेस लावण्यात आले आणि उपस्थितांकडून ध्वजदिन निधी संकलित करण्यात आला.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल शरद पांढरे म्हणाले,आपण सर्वांनी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी निधी

संकलन करणे हे समाजातील मोठे योगदान आहे.

आज याच सैनिकांमुळे आपण सुरक्षित असून सैनिकांच्या कुटुंबांची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. सशस्त्र सेना ध्वजदिनानिमित्ताने संकलित केलेला निधी सैनिक, माजी सैनिक, सैनिकांच्या विधवा आणि मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करण्यात येतो.त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी ध्वजदिनी निधी संकलनात पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ.मैनाक घोष, प्र.अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत, जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, तहसीलदार (महसूल) अभिजीत जगताप,एनसीसीचे कमांडर ऑफिसर श्री.मेहता यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध युद्धामध्ये शहीद झालेल्या जिल्ह्यातील सैनिकांच्या वीर पत्नी व वीर माता यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

माजी सैनिक यांच्या विविध शैक्षणिक वर्षात यश संपादन केलेल्या पाल्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. माजी सैनिक यांना स्वयंरोजगारासाठी ३ लक्ष रुपये मदत करण्यात आली.

यावेळी ध्वजदिन निधी संकलनाची सुरुवात उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांना ध्वजाचा बॅच लावून करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष भरून काढा : आ. हेमंत पाटील

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २२ डिसेंबर

नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देण्यात यावी, कृष्णा खोऱ्यातील वाहून जाणारे पाणी लातूर, धाराशिव जिल्ह्याकडे वळविण्यात यावे, उजनी धरणाचे २५ टीएमसी पाणी मराठवाड्याकडे वळवून यासह मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी मराठवाड्यासाठी महत्वाचे सिंचन प्रकल्प मार्गी लावून कार्यान्वित करावेत. अशी अभ्यासपूर्ण मागणी विधानपरिषद शिवसेना गटनेते तथा आमदार हेमंत पाटील यांनी विधानपरिषदेत केली.

सिंचनाच्या बाबतीत मराठवाडा आजपर्यंत मागे असल्यामुळे मराठवाड्याचा विकास सुद्धा म्हणावा त्या गतीने झालेला नाही. सिंचन आणि पाण्याची मुबलक सुविधा झाल्यास मराठवाडा सुजलाम सुफलाम होऊ शकतो. महायुती सरकारने मागील कार्यकाळात अनेक महत्वाचे प्रकल्प हाती घेऊन पूर्णत्वास नेले आहेत. मुंबईमधील वाहतुकीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कोस्टल रोड शिवडी - न्हावाशेवा रस्त्यामुळे मुंबई मधून जलद गतीने बाहेर पडण्यासाठी मदत झाली आहे. त्यामुळे आता महायुती सरकारला विनंती आहे की, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प मार्गी लावावेत अशी मागणी आमदार हेमंत पाटील यांनी केली. विधान परिषदेमध्ये अभ्यासपूर्ण मांडणी करताना आमदार पाटील म्हणाले की, दि.१६ सप्टेंबर २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत ३७ हजार १६ कोटीच्या मराठवाडा विकासाच्या योजनांना मंजुरी देण्यात आली होती. त्या अनुषंगाने यंत्रणा कार्यन्वित करावी तसेच सिंचन अनुशेष भरण्यासाठी २०१६ साली मंजूर झालेला व २०१७ साली निविदा निघालेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प सुद्धा हाती घ्यावा.

मराठवाडा विभागातील ६४ लाख ४५ हजार हेक्टर क्षेत्र लागवडी योग्य आहे परंतु त्यापैकी केवळ ११.८६ लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणले आहे. आणखी ६.७१ लक्ष हेक्टर सिंचन अनुशेष शिल्लक आहे. यासाठी वैनगंगा, नळगंगा, पैनगंगा या मराठवाडा विदर्भाला जोडणाऱ्या प्रकल्पास मान्यता द्यावी. पहिल्या टप्यात ३२६ किमी च्या कालवे दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याच धर्तीवर नळगंगा ते पैनगंगा कालवे जोडणीस सुद्धा प्रशासकीय मान्यता देण्यात यावी असेही आमदार हेमंत पाटील म्हणाले. कृष्णा खोऱ्यातील वाहून जाणारे पाणी आणि माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी मागणी केल्यानुसार उजनी धरणातून २५ टीएमसी पाणी मराठवाड्याकडे वळविण्यात यावे तसेच सहयाद्री माथ्यावर पडणारे १६८ टीएमसी पाणी कोकणात वाहून जाते. त्यापैकी १५५ टीएमसी पाणी बोगदा किंवा लिफ्टद्वारे मराठवाड्याकडे वळविण्यात आल्यास सिंचन अनुशेष भरून निघण्यास मदत होईल. दरम्यान आमदार पाटील यांनी सभागृहात २६० नुसार आणलेल्या विधेयकास समर्थन देऊन महायुती सरकारच्या कार्याचे कौतूक केले.

लेखी आश्वासनानंतर आंदोलकांनी उपोषण सोडले

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. २२ डिसेंबर

पोलीस स्टेशन माहूर येथे दाखल गुन्ह्यातील दोषींवर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी या मागणीसाठी फिर्यादी कॉ.चंद्रकांत रामदास लोखंडे यांचे नांदेड जिल्हाधीकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु होते.त्यांनी केलेल्या मागणीनुसार सदर गुन्ह्याच्या तपासासंबधाने मोबाईल नंबरचे सि.डी.आर. तपासले जातील तसेच ग्रामीण रुग्णालय माहूर येथील सि.सि.टी.व्ही फुटेज तपासुन पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली असल्याचे माहूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी लेखी पत्राद्वारे आश्वासन दिल्याने लोखंडे यांनी सुरू असलेले आपले उपोषण अखेर मागे घेतले आहे. २७ नोव्हेंबर पासून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वझरा शेख फरीद ता.माहूर येथील पीडित दलित युवक कॉ.चंद्रकांत लोखंडे यांचे उपोषण सुरु होते.दरम्यान, त्यांच्या अर्जाची तातडीने दखल घेत माहूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी या प्रकरणातील वझरा शेख फरीद येथील दोघांविरुद्ध १८ ऑक्टोबर रोजी अट्रॉसिटी व इतर कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

परंतु, ग्रामीण रुग्णालय माहूर येथील ६ ते ८ सप्टेंबरचे सीसीटीव्ही फुटेज आणि आरोपींच्या मोबाईल फोनचा सीडीआर काढून पुढील तपास करून योग्य कारवाई होणे बाकी असून, तपासात गुन्हा निष्पन्न झाल्यास पुढील कारवाई होऊन गुन्ह्यात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दि.१९ डिसेंबर रोजी नांदेड पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या निर्देशाने माहूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी उपोषणार्थीस कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यामुळे उपोषण सोडविण्यात आले आहे.या उपोषणास सीटू संलग्न मजदूर युनियनचा पाठिंबा होता. माहूर पो. स्टे.चे पोलीस अंमलदार मेडपलवार यांनी लेखी पत्र देऊन, जवाब घेतला व उपोषण सोडविले आहे.यावेळी मजदूर युनियनचे अध्यक्ष कॉ.गंगाधर गायकवाड, कॉ.जयराज गायकवाड, ड.यशोनील मोगले, ड.अभिमान राऊत, कॉ.मारोती केंद्रे, कॉ.नवनाथ सावंत सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त

INFLUENZA-A विषाणुमुळे देगलूर येथील संगणक अभियंतीचा मृत्यू

देगलूर -देगलूर येथील भक्तापुररोड परिसरातील सद्गुरुनगर मधील रहिवाशी सौ. मनीषा व्यंकटेश रासकोटवार यांचे (आखाती देश, दुबईच्या

बाजूस असलेल्या) बहरीन येथील हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान शनिवारी दि.२१ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजता दुःखद निधन झाले. सौ. मनीषा व त्यांचे पती व्यंकटेश रासकोटवार हे पती-पत्नी बहरीन येथे संगणक अभियंता म्हणून कार्यरत होते. उस्मानीया विद्यापीठातून बी. टेक. पदवी प्राप्त केलेल्या सौ मनीषा गेल्या १० वर्षापासून तिथे नोकरीच्या निमित्ताने वास्तव्यास होत्या. दि. २८ नोव्हेंबर २४ रोजी त्यांना रॉयल हॉस्पिटल बहरीन येथील रुग्णालयात पुत्ररत्न झाले होते. प्रसूती दरम्यान त्यांना इन्फलुएंजा' ए या विषाणुचा संसर्ग झाला होता. कोरोना पेक्षा ही भयंकर असणाऱ्या या विषाणूशी त्या २० दिवस हॉस्पिटलमध्ये झुंजत होत्या. अखेर शनिवारी रात्री त्यांची ही झुंज अपयशी ठरली. मृत्यू समयी त्यांचे वय ३३ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पती व्यंकटेश रासकोटवार, एक मुलगी (वय ८ वर्ष,) मुलगा (वय एक महिना) सासू ,सासरे, दोन नणंद , व एक दिर असा परिवार आहे. देगलूर तालुका तेली समाजाचे अध्यक्ष नागनाथ रासकोटवार यांच्या मनीषा या स्नुषा होत. मनीषा चा मृतदेह तेथील रुग्णालयातील शवाग्रहात ठेवण्यात आला आहे. छोट्या बाळाचे(व्हिसा) काढण्याचे काम सुरू असून ते सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर डेड बॉडी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. बुधवार दि.२५ रोजी ते विमानाने हैदराबाद मार्गे देगलूर येथे येण्याची शक्यता आहे त्यानंतर त्यांच्यावर अंतिमसंस्कार केले जाणार असल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात आले.

झलकारीबाई यांच्या संयुक्तीक जयंतीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- गुणवंत मिसलवाड

नांदेड- क्रांतीकारी राघोजी भांगरे प्रतिष्ठान वसरणी नांदेड यांच्यावतीने दि. २९ डिसेंबर २०२४ रविवार रोजी सकाळी ठिक १० वाजता आदिवासी आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे, धरती आबा बिरसा मुंडा, शूर वीरांगणा राणी झलकारीबाई यांच्या संयुक्तीक जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या भव्यदिव्य अशा जयंती सोहळ्यास नांदेड जिल्ह्यासहीत राज्यातील आदिवासी कोळी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आदिवासी कोळी समाजाचे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड, भालचंद्र मोळके, नागनाथ मोळके, सचिव सुधाकर भिसे, बालाजी मोरे, बापूराव मोरे, सदस्य दिगांबर जटाळे व इतर सर्व सदस्य क्रांतीकारी, लक्ष्मीबाई घोरपडे, उपाध्यक्षा रुक्मीणीबाई मोरे, सचिव वर्षाबाई सुर्यवंशी, सहसचिव शोभाबाई मोळके, कोषाध्यक्षा गीता वाघमारे, सदस्या सोनाली मोळके व इतर सर्व सदस्या व तमाम कोळीवाडा वसरणी नांदेड यांनी केले आहे. या जयंती उत्सवामध्ये सर्वप्रथम महापुरुषांना अभिवादन, झाँकी मिरवणूक, निसर्ग आदिवासी दैवत पूजन, मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा, उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार तद्रंतर कार्यक्रम जाहीर सभेला सुरुवात होईल.

कै.यशवंतराव बळवंतराव पाटील यांचे ९९ व्या वर्षी निधन

बाऱ्हाळी- सकनूर (ता.मूखेड) येथील जेष्ठ नागरिक , पंचक्रोशीत

प्रसिद्ध व्यक्तीमत्व तथा २५ वर्षे सरपंच पदाची धूरा सांभाळणारे मा.सरपंच मा.चेअरमन यशवंतराव बळवंतराव पाटील (वय ९९ वर्षे) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात ऐक मूलगा,दोन मूली, नातू नाती,पंतू असा मोठा परीवार आहे.चेअरमन मोहन पाटिल यांचे वडील तर भाजपाचे मूखेड तालुका अध्यक्ष बालाजी पाटील यांचे आजोबा होत.

बिलोली पंचायत समितीला आयएसओ मानांकन

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २२ डिसेंबर

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी पुढाकार घेत आहेत. याअंतर्गत आज बिलोली पंचायत समितीला आयएसओ मानांकन मिळाले आहे. बिलोली पंचायत समिती आयएसओ मानांकन मिळवणारी जिल्ह्यातील पाचवी पंचायत समिती ठरली आहे.

आयएसओ मानांकन मिळवलेल्या बिलोली पंचायत समितीच्या यशाचे श्रेय विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाते. यापूर्वी नांदेड, लोहा, मुदखेड आणि देगलूर पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले होते.

बिलोली पंचायत समितीतील आयएसओ मानांकन वितरण कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, गट विकास अधिकारी श्रीनिवास पदमावार, सहायक गट विकास अधिकारी आर.डी. क्षिरसागर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार, बिलोली पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मुख्य

जिल्ह्यातील पाचवी पंचायत समिती झाली आयएसओ

कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते बिलोली पंचायत समितीस आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देण्यात आले. या मानांकनामुळे पंचायत समितीची जबाबदारी वाढली आहे. पंचायत समितीला आयएसओ मानांकन मिळाल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कारनवाल यांनी कौतुक केले आहे. बिलोली पंचायत समितीने केंद्र व राज्य शासनाच्या विविध महत्त्वपूर्ण उपक्रमांचे प्रभावी अंमलबजावणी केली आहे. झिरो पेंडन्सीची कार्यक्षमता, तसेच विविध विभागांमध्ये केली गेलेली उत्कृष्ट कामगिरीमुळे आयएसओ मानांकन मिळाले आहे. यामध्ये सामान्य प्रशासन, शिक्षण, आरोग्य, पंचायत, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, स्वच्छता व पाणी पुरवठा अशा विविध विभागातील प्रभावी कामाची दखल घेऊन हे मानांकन देण्यात आले आहे.

उसतोड मजुरांना चादरींचे वाटप

तभा वृत्तसेवा
मुखेड,दि. २२ डिसेंबर

मुखेड:राज्यात सर्वत्र थंडीची जोरदार लाट सुरू आहे. तापमानाचा पारा खुप खाली आला आहे.याचा फटका परिसरातील दूरवरून आलेल्या ऊसतोड कामगारांना बसत आहे.पालीत स्थलांतर उसतोड समुदाय आपल्या मुलाबाळांना घेऊन आस्मानी संकटाचा सामना करत आपले जीवन जगत आहेत. वंचित घटकांसाठी हीच सामाजिक बांधिलकी जपत शहरातील शैक्षणिक, सामाजिक,पर्यावरण आदी क्षेत्रांत अग्रेसर राहून काम करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानच्या छत्रपती गणेश मंडळ दिपनगर,मुखेडच्या वतीने ऊसतोड कामगारांना थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार चादरींचे नुकतेच वाटप करण्यात आले.या उपक्रमा बद्दल ऊसतोड कामगारांनी गणेश मंडळाचे आभार मानले.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष मा.विनोद पाटील, उपाध्यक्ष सचिन मेंनकुदळे,सदस्य विकास जाधव, संतोष तळेगावे,वैभव इंगळे,शुभम वडजे, गजानन गुंडे, अनिकेत पांचाळ, रितेश डुमणे आदी सदस्य उपस्थित होते.

'शाहू फेस्टिवल' निमित्त ४ जानेवारी रोजी सांस्कृतिक मेजवानी

तभा वृत्तसेवा
भोकर,दि. २२ डिसेंबर

भोकर येथील श्री शाहू महाराज मध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वतीने दि.४ जानेवारी रोजी पासूनशाहू फेस्टिवल मध्ये विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांसाठी ही आगळी वेगळी मेजवानी ठरणार आहे

दरवर्षी शाहू परिवाराकडून राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धांचे आयोजन केल्या जाते यावर्षी अनेक सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यात सुगमवादन (ताल तंतू, सुषीर) सुगम गायन (भावगीत, लोकगीत, भक्ति) व रेकॉर्ड डांस आदींचा समावेश आहे. या स्पर्धा राज्यस्तरीय पातळीवर घेण्यात येणार असून त्यात इयत्ता५ वि पासून पुढील कोणत्याही वर्गात शिकत असण्याऱ्या मुलामुलींना सहभागी होता येईल, स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. स्पर्धकांनी शाळा महाविद्यालयाच्या

लेटरपॅड वर मुख्याध्यापक/ प्राचार्यांच्या प्रामुख्याच्या सही शिक्यांनीशी दि ३१ डिसेंबर पर्यंत प्रवेशिका मो.नं ८४८४०९११७०, ७५८८५२३५२०,९३२५१५८३०५ या क्रमांकावर पाठवून आपला प्रवेश निचित करावा. प्रवास व जेवण भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. बक्षीसाचे स्वरूप,प्रथम परितोषिक११००० रु ,द्वितीय परितोषिक ७००० रु ,तृतीय परितोषिक५००० रु. आहे असे श्री शाहु महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोकर चे मुख्याद्यापक एस.एम.सावंत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

धनेगाव ते लातूर फाटा महामार्गावरील उड्डाणपुलाच्या कामात दिरंगाई ; नागरीक संतप्त

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड, दि. २२ डिसेंबर

धनेगाव ते लातूर फाटा या महामार्गावरील डेअरी ते धनेगाव जवळील उडान पुलाचे काम हे खाली गाळे सोडून करण्याची मागणी करून मंजुरी घेऊन सुद्धा हे काम धनेगावच्या नागरिकांच्या मागणीप्रमाणे न होता अभियंता आनंद पुयड यांच्या मर्जीप्रमाणे दिरंगाई होत असल्याने दि. २१ डिसेंबर रोजी जेसीबी द्वारे होत असलेले काम माजी आ. मोहनराव हंबर्डे व माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी मनमानी होणारे काम थांबवण्यात आले.

धनेगाव ते लातूर फाटा महामार्ग ३६१ वरील धनेगाव ते डेअरी या ठिकाणी होत असलेले उड्डाणपुलाचे काम हे खाली गाळे सोडून करण्यात यावे अशी मागणी धनेगाव सरपंच पिंटू शिंदे, जी. प . सदस्य मनोहर शिंदे व गावकरी यांच्यावतीने वारंवार

शासनाकडे करण्यात आली आहे. आणि त्यांच्या मागणीला मंजुरीसाठी महामार्गमंत्री नितीन गडकरी, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी दिली होती. तरीसुद्धा आज घडीला या विभागाचे अभियंता आनंद पुयड उलट-सुलट कामे करत असल्याने दि. २१ डिसेंबर रोजी सदरील महामार्गाचे काम बंद करण्यात आले व यावेळी येथे होणाऱ्या उलट सुलट कामाची तक्रार अभियंता यांच्या विरोधात माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, आ. अमर राजूरकर, आ.प्रतापराव चिखलीकर यांना ताबडतोब फोनवरून संवाद साधून घटनास्थळावरून माजी आ. मोहन हंबर्डे व माजी जि. प. सदस्य मनोहर शिंदे यांनी चर्चा करून काम बंद करण्यास सांगितले सदरील महामार्गावरील काम करत असताना दोन्ही बाजूच्या नाल्या, सांडपाण्याची व्यवस्था, विजेची खंबे, गुराढोरांना जाण्यासाठी रस्ता, पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्या फुटल्या आहेत. त्या अगोदर दुरुस्त करणे, या जलवाहिनीतून चार गावाला पाणीपुरवठा आहे. तसेच आ.मोहनराव हंबर्डे यांनी सांगितले की कौठा ते विष्णुपुरी येथील देखील जलवाहीनीचे काम दोन वर्षांपासून रखडले आहे. याचीही प्रशासनाने नोंद घ्यावी. अशाच प्रकारची कामे सोडून प्रथमदर्शी करून इतर कामे नंतर करण्यास वारंवार सांगून ही पुन्हा पुन्हा चुकीची कामे होत असल्याने विभाग अभियंता आनंद पुयड यांनी नियमाप्रमाणे व वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे कामे करावी यासाठी दि. २१ डिसेंबर रोजी धनेगाव ते डेअरी या ठिकाणी काम बंद करण्यात आले. यावेळी मोहनराव हंबर्डे, माजी जि.प. सदस्य मनोहर शिंदे, धनेगाव नगरीचे सरपंच पिंटू शिंदे, गंगाधरराव कवाळे, रावसाहेब महाराज, तातेराव ढवळे, आ गफूर आ.खादीर, राजू बोटलवार, रमेश वाघमारे, वेंकटेश शिंदे, मेहकरकर, रणवीरकर, दिगंबर चुडामन शिंदे, शंकर शिंदे यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती तर यावेळी ग्रामीण ठाण्यांचे सपोउपनि. गंगाधर भालेराव सपोउपनि .प्रवीण कदम व पोलीस कर्मचारी यांची उपस्थिती होती.

नरसीत धुरपतमाय मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलशारोहन सोहळा

तभा वृत्तसेवा
देगलूर,दि. २२ डिसेंबर

नरसी येथील सकल ग्रामवासीयांची वतीने धुरपतमाय या ग्रामदेवतेचा दि. २३ डिसेंबर रोजी रोज सोमवारी सकाळी मुर्ती प्राण प्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या विज्ञानाच्या युगातील मानवी जीवनात खूप काही प्रगती झाली असली तरी ही अजूनही ग्रामीण भागातला व्यक्ती हा गावातील व गाव कुशीत स्थापित आसलेल्या धुरपतमाय या सारख्या ग्रामदेवतेची आज भक्त भावाने श्रध्देने श्रध्दा ठेवून मनोभावे पुजा केली जाते. त्या अनुषंगाने याठिकाणी येणाऱ्या भक्तांसाठी थोडा वेळ विसावा

घेण्यासाठी व येथील मंदिरांचा जीर्णोद्धार व्हावा या उद्देशाने नरसी

येथील सकल समाज बांधवांचे गावाच्या कुशीतील श्रध्देचे श्रध्दास्थान असलेल्या धुरपत माय (ग्रामदेवतेचा)गावदेवी मंदिराचे नरसी येथील सकल समाज बांधवांच्या सहकार्यातून मागील कार्यकाळामध्ये नव्याने बांधकाम करुन मंदिर पुर्णत्वास गेले असुन. येथील भक्त मंडळींच्या पुढाकारामुळे व सकल समाज बांधवांच्या सहकार्याने दि .२३डिसेंबर २०२४ रोजी सोमवारी सकाळी सकल समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये पारंपारिक पद्धतीने विधिवत पूजा करून येथील मंदिरातील धुरपतमाय(ग्रामदेवतेचा) मुर्ती प्राण प्रतिष्ठा करून कलशारोहण सोहळ्याचे आयोजन केले आहे. कलशरोहणाचा कार्यक्रमा नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी नरसी परिसरातील गावातील भक्त मंडळींनी उपस्थिती लावून या महाप्रसादाचे लाभ घ्यावा असे आवाहन येथील सकल भक्त मंडळी कडून करण्यात आले आहे.

भोकर नगरपालीका प्रशासनाचे स्वच्छतेकडे दूर्लक्ष

तभा वृत्तसेवा
भोकर,दि. २२ डिसेंबर

नगरपरिषदेच्या पाणी पूरवठा विभाग व घनकचरा व्यवस्थापनाच्या ढिसाळ नियोजनाने शहरवासीयांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून कार्यालयातील कर्तव्यावरील कर्मचारी आपल्या वयक्तित कामाला प्राधान्य देत असल्यामूळे सर्वसामान्य नागरीकांची पालिकेत कामासाठी हेळसांड होत आहे. घनकचरा व्यवस्थापनाकडून शहर स्वच्छतेकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष होत असल्याने शहरातल्या रस्त्यावर सर्वत्र कचरा दिसुन येते. घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाकडून न.प.ला पूरेसा निधी मिळूनही निधीचा योग्य वापर नगरपरिषदेकडून होत नसल्याचे दिसून येते. परिणामी शहरात अस्वच्छता निर्माण होते. 'स्वच्छ शहर सूंदर शहर' हे केवळ भिंतीवर शोभून दिसत असले तरी

प्रत्यक्षात मात्र चित्र उलटे दिसत आहे.

घनकचरा व्यवस्थापनाकडून कंत्राटी कर्मचारी मार्फत कचरा उचलण्याची कामे केली जातात. कंत्राटीची संख्या किती व त्यांना मानधन किती दिले जाते त्यांच्या आरोग्याच्या सूरक्षेचे काय? अनेक प्रश्न आहेत. शहरात मृत जनावरे घंटागाडीत टाकून शहराबाहेर फेकले जातात. तसेच नालीतील घाण उचलतात घणकचरा व्यवस्थापनाकडून अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांना अल्पमानधन देण्यात येत असले तरी त्यांच्या आरोग्याचे काय असा प्रश्न उपस्थित होतो. त्यांना सूरक्षेचे उपकरणे दिली जात नसल्याच्या तक्रारी आहेत लाखोंचा निधी शहर स्वच्छतेसाठी वितरीत होत असताना शासनाच्या डोळ्यात धूळफेक करुन निधीची विल्हेवाट लावत असल्याचे निदर्शनास येते नाव परिवर्तन आणि गूंठेवारीचे प्रस्ताव धूळखात पडून आहेत. कर्मचारी वेळेत कर्तव्यावर उपस्थित न रहाता आपल्या वयक्तिक कामाला अधिक वेळ देत असल्याचे पहावयास मिळते यामूळे कामासाठी पालीकेत येणाऱ्या नागरीकांची हेळसांड होत आहे. संपूर्ण भोकर शहरासाठी शूध्द पिण्याचे पाणी म्हणून पूरवठा करण्यात येतो.

सदरील पाण्यामध्ये अशूध्दतेचे प्रमाण अढळून येत आहे. असंख्य कूटूंबे पालिकेचे पाण्यावर अवलंबून असल्याने पालिकेच्या क्षम्य दूर्लक्षाने नाईलाजाने अशूध्द पाणी प्यावे लागते. नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. नगरपालीकेच्या ढिसाळ नियोजनामूळे शहरवासीयांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वरिष्ठांनी पालिकेच्या भोंगाळ काराभाराकडे लक्ष देवून कारभार सूरळीत करण्यात यावा अशी मागणी शहरातील नागरीक करित आहेत.

बालरोग चिकित्सा जगासाठी देणगी

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २२ डिसेंबर

श्री गोवर्धन गोसेवा प्रकल्प, कोल्हा येथे सुरू असलेल्या तीन दिवसीय निवासी आयुर्वेद गुरूकुलाचा दुसरा दिवस विविध विषयांवरील आयुर्वेद तज्ज्ञांच्या विद्वत्तापूर्ण व्याख्याने व औषधी निर्माण यांनी उत्साहात पार पडला. आयुर्वेदातील बालरोग चिकित्सा ही जगासाठी देणगी असल्याचे श्री विश्वेश्वर आयुर्वेद गुरूकुलात डॉक्टरांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी पुणे येथील प्रसिद्ध आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. श्रीरंग गलगली, नागपूरच्या बालरोग चिकित्सक डॉ. निकम मॅडम व सांगली येथील आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. रविंद्रकुमार माने यांचे व्याख्यान झाले. डॉ. श्रीरंग गलगली यांनी विद्वत्तापूर्ण व वैज्ञानिक दृष्टीने आयुर्वेदातील यशस्वी बालरोग चिकित्सांचे वर्णन केले.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २३ डिसेंबर २०२४

जैन टॅगच्या अध्यक्षपदी श्वेता कासलीवाल तर उपाध्यक्षपदी पुर्वा कासलीवाल यांची निवड

सचिवपदी जयश्री लोहाडे,कोषाध्यक्षपदी श्वेता गंगवाल

औरंगाबाद प्रतिनिधी - नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी कार्यात अग्रेसर असलेल्या व वर्षभर विविध नवनवीन उपक्रम राबविणा-या जैन टॅग ग्रुपच्या नुतन अध्यक्ष पदी श्वेता कासलीवाल तर उपाध्यक्ष पदी पुर्वा कासलीवाल,सचिव पदी जयश्री लोहाडे,कोषाध्यक्ष पदी श्वेता गंगवाल यांची २०२५ साठी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी जैन टॅगच्या संरक्षिक अनुपमा दगडा दिपीका बडजाते,, यांच्या मार्गदर्शनाखालील हि निवड करण्यात आली. यावेळी मावळत्या अध्यक्षा रिचा कासलीवाल यांनी आपला पदभार अध्यक्षा श्वेता कासलीवाल यांच्याकडे सोपविला. यामध्ये कार्यकारणी मध्ये रिना ठोळे याशिका पांडे स्वाती कासलीवाल,छाया कासलीवाल,रचना पहाडे,नेत्रजा कासलीवाल,मिताली काला,रानु सेठी,सिमा बडजाते,सारिका बडजाते,किर्ती पाटणी,उज्वला पाटणी,सपना पाटणी,पुजा झांजरी आदींची सदस्य पदी निवड करण्यात आली.

नुतन कार्यकारणीला सकल जैन समाज,खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार चे अध्यक्ष महावीर पाटणी,सचिव प्रकाश अजमेरा,विजय अजमेरा, दिनेश सेठी, ॲड.अनिल कासलीवाल, निकेतन कासलवील, आनंद सेठी, पदम गंगवाल, संतोष अजमेरा यांच्यासह आदींनी शुभेच्छा दिल्या. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

भारतीय साहित्य सांस्कृतिक मंच छत्रपती संभाजीनगरच्या उपाध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक पद्माकर वाघरूळकर

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २२ डिसेंबर : सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या बिडकीन शाखेवरील भाषा शिक्षक पद्माकर दत्तात्रय वाघरूळकर (दत्तिदुसुत)

यांची त्यांचे साहित्यातील भरीव योगदान लक्षात घेऊन भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच जिल्हा छत्रपती संभाजीनगरच्या उपाध्यक्षपदी राष्ट्रीय अध्यक्ष विशाल सिरसट, राष्ट्रीय उपाध्यक्ष विजय जायभाये यांच्या स्वाक्षरीच्या नियुक्तीपत्राने नेमणूक करण्यात आली.साहित्यिक पद्माकर वाघरूळकर यांच्या नियुक्तीचे राष्ट्रीय कार्याध्यक्षा शिल्पा मुसळे, राष्ट्रीय सचिव बारकू आघाव, कोषाध्यक्षा छाया देसले, महिलाध्यक्षा चैताली कापसे, प्रदेशाध्यक्ष अजयकुमार वंगे, जिल्हाध्यक्ष ऋषिकेश आव्हाळे यांनी अभिनंदन करून स्वागत केले. पद्माकर वाघरूळकर हे गेल्या सव्वीस वर्षांपासून श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेच्या छत्रपती संभाजीनगर, बालानगर, कुंभार पिंपळगाव व बिडकीन येथे उत्कृष्ट भाषा व सामाजिक शास्त्रशिक्षक म्हणून यशस्वीपणे कार्य करत असून साहित्यातील गद्यपद्यासह सर्वच प्रकार अगदी लिलया हाताळतात. त्यांनी अनेक साहित्यिक समुहांवर परीक्षक म्हणूनही कार्य केलेले आहे. त्यांच्या निवडीचे छत्रपती संभाजीनगर, बालानगर, कुंभार पिंपळगाव व बिडकीन परिसरातील मित्रमंडळी व साहित्यिकांनी अभिनंदन केले. श्री स.भु.शिक्षणसंस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, शिरीषकुमार मोरे, प्रल्हाद बोराडे, विश्र्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, राजू शिंदे, ज्ञानेश्वर चाटुपळे, तुषार अहिरे, संजय कंटुले, बाबासाहेब सोकटकर,रायभान ठाणगे,यांसह आदींनी अभिनंदन केले.

शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना सोयगाव तालुका अध्यक्षपदी ज्ञानेश्वर वाघ तर उपाध्यक्षपदी ईश्वर सपकाळ

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ डिसेंबर

सोयगाव तालुक्यातील घोसला येथील ज्ञानेश्वर (आप्पा) वाघ यांची सोयगाव तालुका अध्यक्षपदी निवड तर सोयगाव तालुका उप अध्यक्षपदी ईश्वर सपकाळ यांची निवड करण्यात आली.संघटनेचे प्रदेश अध्यक्षह भ.प.अक्षय महाराज भोसले यांच्या आदेशानुसार छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष ह.भ.प.कडूबा महाराज गव्हाले यांच्या हस्ते करण्यात आली. सोयगाव तालुका घोसला येथील ज्ञानेश्वर (आप्पा) वाघ यांची त्यांच्या आदिवासी अध्यात्मिक क्षेत्राच्या कामगिरी नुसार काम करण्याची पद्धत लक्षात घेता त्यांच्यावर संघटनेच्य

सोयगाव तालुका अध्यक्षपदी संघटनेचे प्रदेश अध्यक्ष अक्षय महाराज भोसले सातारा उप प्रदेशाध्यक्षह भ.प.पुष्कर महाराज पैठण छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष कडूबाळ महाराज गव्हाले यांच्या हस्ते करण्यात आली.या नियुक्तीबद्दल संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष पारस महाराज जैन,शुभम पाटील,महेश खैरनार,कौशल पाटिल,युवराज मातेरे,लक्ष्मण पाटील,सर्जे राव पवार, भाऊसाहेब भालेराव,आदींनी त्यांना पुष्पुच्छ देऊन त्यांना शुभेच्या दिल्या.

१० कि. मी. पुरुष गटातील स्पर्धांमध्ये ग्रँडसिंग चंदेल, अंगद कन्हेरे, राकेश यादव, संतोष वाघ, भीकणराव देहाडे यांनी पटकाविला प्रथम क्रमांक

उत्साहपूर्ण वातावरणात एमजीएम रन फॉर हेरिटेज संपन्न

१० कि. मी. महिला गटातील स्पर्धांमध्ये अमृता गायकवाड, अश्विनी लहाणे, अर्चना जगताप, विठाबाई कछवे, मानसी कागवते प्रथम

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ : महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे एमजीएमच्या वतीने 'एमजीएम रन फॉर हेरिटेज २०२४ मॅरेथॉन' चे आज सकाळी ६ वाजता एमजीएम स्टेडियम येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हजारो धावपटूंनी उत्साहपूर्ण वातावरणात आपला सहभाग नोंदविला. मान्यवरांनी झेंडा दाखवून 'एमजीएम रन फॉर हेरिटेज २०२४ मॅरेथॉन'चे उद्घाटन केले.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ,महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलाचे कामांडंट विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख प्रा.डॉ.दिनेश वंजारे, प्रा.डॉ.शशिकांत सिंग, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, धावपटू व सर्व संबंधित उपस्थित होते.

एमजीएम मॅरेथॉनचे यंदाचे हे नववे वर्ष असून दरवर्षी मोठ्या उत्साहात नागरिक यामध्ये सहभागी होत असतात. शहरातील वारसा स्थळांबाबत जनजागृती करीत नागरिकांना या माध्यमातून एकत्रित केले जाते. शहराची असलेली ऐतिहासिक ओळख आणि ती जपण्यासाठी आपण आपल्या स्तरावर काय करू शकतो, याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी हेरिटेज रन सुरू होण्यापूर्वी धावपटूंचा वार्मअप करून घेण्यात आला.

या मॅरेथॉनमध्ये पुरुष आणि महिला गटामध्ये स्वतंत्रपणे १४ ते २०, २१ ते ३५, ३६ ते ४५, ४६ ते ५५, ५६ ते ६५ या वयोगटातील सुमारे ११०० धावपटूंनी अनुक्रमे ५ आणि १० कि.मी. स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. १० कि.मी. स्पर्धेतील पहिला गट केवळ १६ ते २० वर्ष वयोगटातील वेगळा होता बाकी ५ कि.मी. आणि १० कि.मी. स्पर्धांमध्ये सर्व गटांची वरीलप्रमाणे विभागणी करण्यात आली होती.

या मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी नाममात्र शुल्क आकरलेले होते. विविध गटातील प्रथम येणाऱ्या तीन स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते मेडल आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी मॅरेथॉनमध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये विजयी खेळाडूंना एकूण १ लक्ष ६० हजार रूपयांच्या रोख पारितोषिकांचे मान्यवरांचे हस्ते वितरण करण्यात आले. 'एमजीएम रन फॉर हेरिटेज २०२४ मॅरेथॉन' च्या यशस्वी आयोजनामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपले योगदान दिले.

यावर्षी स्पर्धेसाठी प्रथमच 'बिब विथ टाईम टेक्नोलॉजी'चा वापर करण्यात आला होता. यामुळे स्पर्धेचा निकाल अचूक आणि कमी वेळेमध्ये लावणे शक्य झाले. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना या तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे आपली स्पर्धे तील अचूक वेळ कळण्यास सोपे झाले. 'एमजीएम रन फॉर हेरिटेज २०२४ मॅरेथॉन' स्पर्धेमध्ये यावर्षी वाहतूक पोलिस, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल, ग्रामीण पोलिस, सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ तसेच संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या विविध स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला.

'एमजीएम रन फॉर हेरिटेज २०२४ मॅरेथॉन' स्पर्धेच्या यशस्वितेसाठी डॉ.सदाशिव जव्हेरी, प्रा.रहीम खान, डॉ.अमरदीप असोलकर, बालाजी शेळके, जॉय थॉमस, प्रविण शिंदे, मुक्तानंद लोंडे व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले आहे. या स्पर्धेचे सूत्रसंचालन अमृत बिराडे यांनी केले.

आ. संजना जाधव यांनी अधिवेशनात मांडले मतदारसंघाचे प्रश्न

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२१ डिसेंबर- कन्नड सोयगाव मतदार संघाच्या संजना जाधव यांनी आपल्या विधानसभेच्या पहिल्याच अधिवेशनात मतदार संघातील महत्वाचे प्रश्न सभागृहात मांडून शासनाचे लक्ष वेधले. यामुळे कन्नड तालुक्यातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला .

यावेळी विधानसभेत पुरवणी मागण्यांच्या चर्चेत सहभाग घेतांना आमदार संजना जाधव म्हणाल्या की, कन्नड सोयगाव मतदारसंघ हा उद्योगाच्या बाबतीत मागासलेला आहे. मतदारसंघात उद्योग उभारणी करण्यास चालना देण्यासाठी एमआयडीसी उभारणी साठी भुसंपादनाची थांबलेली प्रक्रिया पुन्हा सुरु करावी, मतदार संघ हा भौगोलिक दृष्ट्या डोंगराळ भाग आहे. गौताळा अभयारण्य, पितळखोर लेणी, अंतुर किल्ला अशी निसर्गरम्य पर्यटन स्थळेआहेत. मतदारसंघात

जलसिंचनाच्या सुविधा असल्याने शेतीचे उत्पन्नही चांगले आहे. मात्र उत्पादित शेतीमाल बाजारपेठेपर्यंत नेण्यासाठी दळणवळणासाठी चांगल्या रस्त्यांची आवश्यकता असल्याने रस्त्यांची कामे हाती घेणे गरजेचे आहे त्याचबरोबर मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे ६० हजार हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा महसुल मंडळनिहाय अहवाल तहसिल कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आलेला असुन या बाधित शेतकऱ्यांना शासनाने नुकसानीचे अनुदान द्यावे, कन्नड चाळीसगाव जोडणारा औट्रम घाटाचा बोगद्याचा प्रश्न अशा महत्वपूर्ण मागण्या आमदार जाधव यांनी केल्या. आपल्या पहिल्याच अधिवेशनात महत्वाचे मुद्दे मांडून शासन दरबारी प्रश्न मांडले यामुळे कार्यकर्ते ही आनंदी होते .

श्री स.भु.प्रशालेत 'राष्ट्रीय गणित दिवस' साजरा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २२ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत थोर भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती 'राष्ट्रीय गणित दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या गणितीय साहित्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले व उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, प्रमुख पाहुणे पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, कार्यक्रम आयोजक गणित विभाग प्रमुख मंगेश कानोले, प्रमुख वक्ते ज्येष्ठ गणित शिक्षक अविनाश खैरे, सुरेखा जैन, कीर्ती सनेर यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मान्यवरांच्या स्वागतसत्कारानंतर दहावी ड च्या मानसी जोशी व अनिकेत शिंदे या विद्यार्थ्यांनी तर प्रमुख वक्ते ज्येष्ठ गणित शिक्षक अविनाश खैरे यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनकार्याविषयी तपशीलवार माहिती तसेच राष्ट्रीय गणितदिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणितीय साहित्याचे उद्घाटन करून त्याचे सर्वांसाठी प्रदर्शनही भरविण्यात आले होते, त्यात प्रतिक शिंदे ९ ड याचे वर्किंग मॉडेल ऑफ पॉली अँड डिग्री,यश सर्जे ९ ड याचे सम आणि विषम संख्या ,जिज्ञासा भवर ९ ड हिचे भौमितिक आकृत्यांचे आकार, मयुरी जाधव-धनश्री घाटविसावे ९ ड यांचे त्रिमितीय आकृत्यांचे क्षेत्रफळ व आकारमान सूत्र दर्शविणारे घड्याळ, गायत्री मोगल १० अ संख्याचक्र, इकरा शेख ८ ड समांतर रेषा गुणधर्म, प्रणव निकम ८ पायथागोरस प्रमेय, श्रीराम तोतला १० ड गौरी धर्मे १० ड त्रिमितीय आकृत्या, रेहान शेख ९ ई भौमितिक आकृत्या, कृष्णा गायकवाड ९ ई कोनांचे प्रकार यांचा समावेश होता. अध्यक्षीय समारोपात उपमुख्याध्यापक युवराज पाडळे यांनी गणित विषयाचे स्वानुभवाधारित जीवनातील महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश कानोले, सूत्रसंचालन ऋतुजा बडे ८ ई तर आभारप्रदर्शन सुरेखा जैन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर चाटूपळे व प्रशालेतील सर्वच विद्यार्थी व शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे पालक क्रीडा स्पर्धा संपन्न

तभा.दि.२२ डिसेंबर

सोयगाव,दि.२१ डिसेंबर

मुख्य कार्यकारी अधिकारी विकासजी मीना यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या व जयश्री चव्हाण शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर, यांच्या प्रेरणेतून,रंगनाथ आढाव गटशिक्षणाधिकारी सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे जिल्हा परिषद शाळा सोयगाव केंद्र अंतर्गत सर्व शाळांचे केंद्रस्तरीय पालक व विद्यार्थी क्रीडा स्पर्धेचे शुक्रवारी दि.१९ व २० डिसेंबर दोन दिवशीय आयोजन करण्यात आले.

मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी,महिला पालक भगिनी तसेच पुरुष पालकांची संख्या सहभागी खेळाडू म्हणून उत्साहात सहभाग घेतला.पालक क्रीडा प्रकारामध्ये १०० मिटर धावणे,लांब उडी,दोरीवरच्या उड्या,गोळा फेक,खो-

खो,कबड्डी,संगीत खुर्ची,रस्सीखेच इत्यादी क्रीडा प्रकाराचा समावेश होता.

आमखेडा व सोयगाव या जिल्हा परिषद शाळेच्या पालकांनी सुध्दा मोठ्या प्रमाणावर प्रत्येक खेळामध्ये वर्चस्व राखत आपला दबदबा निर्माण केला.तर महिला पालक खेळाडूंनी सध्दा १०० मीटर धावणे संगीत खुर्ची मध्ये वैशाली सोनवणे यांनी प्रथम क्रमांक पटकावत महिला गटात आमखेडा शाळेचा महिला पालक संघ खो-खो विजयश्री ठरला. पालक स्पर्धेत ज्योती मिसाळ,पूजा ढगे, सोनाली कोथलकर,जयश्री पंडित,पूजा कोथलकर,रेखाबाई पायघन,स्वाती शिनकर,शुभांगी शिनकर,वैशाली सोनवणे दुर्गा निकम,सुवर्णा निकम आदी महिला पालकांचा विशेष सहभाग होता तसेच जिल्हा परिषद शाळा,जंगलातांडा व गलवाडा, प्रा.शा.सोयगाव, प्रशाला सोयगाव,आमखेडा, वेताळवाडी मराठी उर्दू, सोयगाव उर्दू मुला मुलींनी अतिशय उत्कृष्टपणे खेळ करत सांघिक भावनेतून खेळाचा आनंद लुटला.पालक विद्यार्थी,क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन फिरोज तडवी केंद्रप्रमुख सोयगाव यांचे हस्ते केले.कार्यक्रमा प्रसंगी जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक मोतीराम जोहरे अंतर्गत शाळांचे मुख्याध्यापक रामदास फुसे,प्रकाश वंजारी, नितेश गवांदे,शफिक शेख,दिलीप इंगळे,किरण पाटील, सविता पाटील,बागवान बिलाल प्रामुख्याने उपस्थित होते, ह्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री शिक्षक रवींद्र तायडे, प्रशांत पाटील, झगाची पोतरे, पंकज रगडे,पारसिंग चव्हाण,गजानन कोळी,मोहन सोनवणे,सय्यद सर,यांनी इत्यादी शिक्षकांनी मेहनत घेतली.सर्व सहभागी शिक्षक, स्पर्धक पालक,विद्यार्थी यांचे फिरोज तडवी केंद्रप्रमुख सोयगाव यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करणयास मदत करते.

अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.

स्वस्थ पाचन, स्वस्थ जीवन

वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935

www.baidyanath.co

प्रज्ञा सुराज्य पक्षाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी शेख गुलाब;-सोयगावात नियुक्ती

सोयगाव,दि.२२ डिसेंबर : प्रज्ञा सुराज्य पक्षाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष पदी सोयगावचे गुलाब अहमद शेख यांची दि.२२ रविवार रोजी झालेल्या पक्षाच्या एका कार्यक्रमात करण्यात आली.प्रज्ञा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद तिगोटे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.यावेळी संस्थापद अध्यक्ष शरद आण्णा तिगोटे,दिपक सोनवणे,शिवाजी माळी,रामेश्वर सिरसाट,ड. रामदास महाजन, रशीद मामु ,शेख सुलेमान शेख, आप्पा मडंवे, रत्न कोळी, कयुम कुरेशी ,नदिम कुरेशी, शेख मुन्ना ,महेबुब पठाण, नंदू मडंवे, फैजशाह आदींची उपस्थिती होती.

परभणीच्या घटनेचा रिपाईच्या वतीने निषेध

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : परभणी येथील संविधानाच्या विटंबने प्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) च्या वतीने निषेध नोंदवून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक कृष्णाकांत शिंदे यांनी रिपाईच्या शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारले यावेळी रिपब्लिकन पक्षाचे प्रवीण नितनवरे, रमेश दाभाडे , किशोर साळवे, अनिल जाधव, चेतन सोनवणे, अशोक वाहुळ, सतिश महापूरे, नितीन जाधव , प्रफुल पाईकराव, निलेश सोनवणे, आकाश वाघ, दिपक वाघमारे, सुमित वानखेडे, किशोर दांडगे आदीची उपस्थिती होती.

संत श्रीगजानन महाराज यांच्या पालखीचे वाजत-गाजत संतनगरी शेगावला प्रस्थान

ठिकठिकाणी पालखीचे स्वागत

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : सकाळच्या कोवळ्या उन्हात प्रकाशमान झालेल्या गारखेड्यातील संतश्रेष्ठ सद्गुरू गजानन महाराज मंदिराच्या गाभाऱ्यात 'श्रीं'चे व त्यांच्या पादुकांचे मनोभावे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते आरती होताच 'श्री गजानन... जय गजानन, शेगावी माझे गुरू गजानन' या नामस्मरणाचा गजर झाला. भक्तिभावात तल्लीन झालेले वारकरी, टाळकरी, भगव्या पताकाधाऱ्यांचे संत गजानन महाराजांच्या पालखीसोबत संतनगरी शेगावकडे प्रस्थान झाले. भाविकांकडून पालखीवर जागोजागी पुष्पवृष्टी करण्यात आली. दहा दिवसांचा पायी प्रवास करून ३० डिसेंबर रोजी पालखी शेगावात दाखल होईल.

सद्गुरू श्रीगजानन महाराज यांच्या समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर ते संतनगरी शेगावपर्यंत काढण्यात येणाऱ्या 'श्रद्धाभूमी ते प्रकटभूमी' या पायी दिंडी पालखी सोहळ्याची सुरवात करण्यात आली होती. समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त सुरू झालेला हा पायी दिंडी पालखी सोहळा आता वार्षिक झाला आहे. गारखेडा येथील श्रीगजानन महाराज (शेगाव) मंदिर विश्वस्त मंडळाकडून दरवर्षी २१ डिसेंबर रोजी ही पायी पालखी निघते. यंदा पालखीचे हे १६ वे वर्ष आहे. मंदिरामध्ये विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा दिंडी संचालक डॉ. प्रवीण वक्ते यांच्या हस्ते 'श्रीं' चे पूजन आणि पादुका पूजन करण्यात आले. गजानन महाराजांचा जयघोष करत पादुका आणि महाराजांचा मुखवटा पालखीमध्ये मांडण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, उद्योजक अनिल भालेराव यांच्या हस्ते व मान्यवरांसह असंख्य भाविकांच्या उपस्थितीत रथाजवळ आरती करण्यात आली आणि पालखी संतनगरीच्या दिशेने मार्गस्थ झाली.

रांगोळ्या अन् फुलांचा सडा

पालखीमध्ये टाळकरी, भगवे पताकाधारी, वारकरी, महिला भजनी मंडळे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'पायी हळूहळू चाला मुखाने गजानन बोला, श्री गजानन...जय गजानन, गण गण गणात बोते' असे नामस्मरण करत भाविक शेगावच्या दिशेने रवाना झाले. पालखीचे जागोजागी स्वागत करण्यात आले. मंदिरापासून ते आकाशवाणीपर्यंत तर पालखी मार्गावर भाविकांनी गजानन माउलींच्या स्वागतासाठी सडा टाकून सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या.

पालखीचे स्वागत

- त्रिमूर्ती चौकात, जवाहर कॉलनीतील व्यापाऱ्यांच्या वतीने वारकऱ्यांना दूध, अल्पोपाहारची व्यवस्था करण्यात आली. - रंगोली कलेक्शनतर्फे रस्ता भरून आकर्षक रांगोळी काढण्यात आली. - माजी नगरसेविका अंकिता विधाते यांच्यातर्फे स्वागत. - स्वाती एंटरप्रायजेसच्या वतीने अल्पोपाहाराची व्यवस्था व शहनाई-चौघडा वादनाने स्वागत. - रामगिरीजवळ राज क्लॉथ येथे पालखीचे स्वागत. - कॅनॉटमध्ये गजानन महाराज भक्त मंडळ व कॅनॉटमधील व्यापाऱ्यांतर्फे स्वागत. - गुलमोहर कॉलनी येथे दिलीप पंडित व गुलमोहर कॉलनीवासीयांतर्फे मसाला दुधाचे वाटप. - बजरंग चौकात शिवाजी दांडगे, मकरंद कुलकर्णी, मंगेश भाले यांच्यातर्फे स्वागत करण्यात आले. - येळीकर, डिक्कर व नंदू काळे या भक्तांच्या वतीने